




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २८३ ■ बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com







## शिक्षण विभागाचा अजब कारभार !

# अस्तित्वात नसलेल्या शाळेत 'RTE' प्रवेश


## पालकांची फसवणूक की क्रूर थट्टा?

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अकोला:** शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (RTE) २५ टक्के राखीव जागांवर गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण मिळावे, यासाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करत असल्याचा दावा करते. मात्र, अकोल्यात या योजनेची चक्क 'ऐशीतैशी' झाल्याचे समोर आले आहे. एका पालकाच्या मुलाला चक्क अशा शाळेत प्रवेश मिळाला आहे, जी शाळा त्या पत्त्यावर अस्तित्वातच नाही! या प्रकारामुळे शिक्षण विभागाच्या पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.संजय बाळकृष्ण चव्हाण या पालकाने आपल्या मुलाच्या, 'अर्णव'च्या प्रवेशासाठी RTE अंतर्गत अर्ज केला होता. ३ एप्रिल २०२६ रोजी त्यांना मोबाईलवर मेसेज प्राप्त झाला की, त्यांच्या मुलाला 'जिजाऊ इंग्लिश मीडियम स्कूल, मलकापूर खडकी, मोरे कॉम्प्लेक्स' येथे प्रवेश मिळाला आहे. आनंदाच्या भरात पालक जेव्हा कागदपत्रे घेऊन शाळेच्या पत्त्यावर पोहोचले, तेव्हा त्यांना धक्काच बसला. कारण, दिलेल्या पत्त्यावर अशी कोणतीही शाळा अस्तित्वात नाही!

**मुख्य सवालः प्रशासकीय यंत्रणा करतेय काय?**

- जी शाळा अस्तित्वातच नाही, तिची नोंदणी RTE पोर्टलवर झाली कशी?
- शाळेची पडताळणी न करताच ऑनलाईन प्रक्रियेत तिचा समावेश कसा करण्यात आला?
- गोरगरीब, आदिवासी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या या हलगर्जीपणाला जबाबदार कोण?




### पालकांचे फिरणे आणि प्रशासनाचे दुर्लक्ष

संबंधित पालकाने मलकापूर आणि खडकी परिसरात शोध घेतला, स्थानिकांशी संवाद साधला, मात्र कोणालाही या शाळेबद्दल माहिती नाही. 'आम्ही कधी अशा शाळेचे नावही ऐकले नाही,' असे उत्तर स्थानिकांनी दिल्याने पालकांचे धाबे दणाणले आहेत. एका बाजूला प्रवेशाची तारीख निघून जात आहे आणि दुसऱ्या बाजूला शाळाच गायब आहे. यामुळे एका आदिवासी कुटुंबातील विद्यार्थ्याचे शैक्षणिक वर्ष धोक्यात आले आहे.

### शिक्षणाधिकाऱ्यांकडे न्यायाची मागणी

याप्रकरणी संतप्त पालक संजय चव्हाण यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद अकोला यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. त्यांनी मागणी केली आहे की, या प्रकरणाची तत्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी आणि त्यांच्या मुलाला परिसरातील इतर सुरु असलेल्या शाळांमध्ये (उदा. समीक्षा शाळा, टाटा शाळा किंवा नारायणा ई-टेक्नो स्कूल) त्वरित प्रवेश मिळवून देण्यात यावा. 'हा केवळ तांत्रिक बिघाड नसून गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची थट्टा आहे. जर यंत्रणेने वेळीच लक्ष दिले नाही, तर या अन्यायाविरुद्ध तीव्र आंदोलन छेडले जाईल,' असा इशारा पालकांनी दिला आहे.आता या 'अदृश्य' शाळेच्या प्रकरणावर अकोला शिक्षण विभाग काय पाऊल उचलते आणि संबंधित पालकाला न्याय मिळतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अशोक खरातची प्रकृती बिघडली

**नाशिक:** दैवी शक्तीचा दावा करत महिलांचे शोषण आणि आर्थिक फसवणूक केल्याच्या आरोपांमध्ये अडकलेल्या भोंदूबाबा अशोक खरात याच्या चौकशीत नवा वळण आले आहे. विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) सुरू असलेल्या चौकशीदरम्यान अचानक त्याची प्रकृती बिघडल्याने एकच खळबळ उडाली. छातीत वेदना, डोकेदुखी, मळमळ आणि उलट्यांचा त्रास सुरू झाल्याने पोलिसांना तातडीने वैद्यकीय मदत बोलवावी लागली. मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली एसआयटीकडून खरातची कसून चौकशी सुरू आहे. एका गुन्ह्यात न्यायालयीन कोठडी मिळाल्यानंतर दुसऱ्या प्रकरणात त्याला पोलिस कोठडीत घेऊन दररोज अनेक तास चौकशी केली जात आहे. मात्र मंगळवारी चौकशीदरम्यान त्याची तब्येत अचानक खालावली.

पिंक न्यूज....

## सावधान ! कॅमेरा-ॲक्शनचा मोह टाळा ! अन्यथा, फसवणूक नक्की ....

# रिल आणि फोटोसेशनच्या नावाखाली शोषणाचे स्टुडीओ ?



प्रतिनिधी २२ एप्रिल

**अकोला:** आजकाल सोशल मीडियावर व्हायरल होण्याचे एक नवे फॅड आले आहे. जास्तीत जास्त लाईक्स, हजारो कॉमेंट आणि फॉलोबॅक मिळवण्याच्या नादात अनेक तरुणी आणि महिला शॉर्टकट शोधत आहेत. मात्र, याच संधीचा फायदा काही विकृत मानसिकतेचे लोक घेत असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत असल्याचे चित्र समोर येत आहे, अशी चर्चा आहे.

शुटिंग, कॅमेरा आणि ॲक्शन या ग्लॅमरस शब्दांच्या आड महिलांच्या शोषणाचे काळे रॅकेट नाही काही स्टुडीओ सक्रिय झाल्याची ओरड दबक्या आवाजात चर्चिली जात आहे. ज्या स्टुडिओमध्ये हे 'भलते उद्योग' सुरू आहेत, त्यांनी आता तरी सुधारावे. अन्यथा, केवळ इशारा देऊन न थांबता, अशा नराधम फोटोग्राफर्सची नावे आणि पत्त्यांसह बातम्या प्रसिद्ध करा असा इशारा समाजमनातून दिला जात आहे. अशी चर्चा रंगली आहे. शहरांमध्ये फोटोग्राफी स्टुडिओच्या नावाखाली भलतेच उद्योग सुरू आहेत. 'प्रोफेशनल पोर्टफोलिओ' आणि आकर्षक कॅनडिड फोटोंचे आमिष दाखवून मुलींना जाळ्यात ओढले जाते. नुसतेच मुलींना नाही तर विवाहित महिलांना देखील अशा जाळ्यात ओढले जात असून त्यांचा गैरफायदा घेतला जात आहे. सुरुवातीला मोफत किंवा कमी दरात शुटिंग करून विश्वास संपादन केला जातो आणि नंतर वैयक्तिक अवकाशात शिरकाव करून त्यांचे शोषण केले जाते. अनेक ठिकाणी 'फोटोग्राफर' म्हणून मिरवणारे लोक प्रत्यक्षात कलेचा सन्मान करण्याऐवजी महिलांकडे 'वस्तू' म्हणून पाहत आहेत.

### तरुणींनो, स्वतःचे रक्षण करा

सगळ्यात पहिले कोणालाच तुमचा फोटो व व्हिडीओ काढू देऊ नका. सोशल मीडियावर कोणी फॉलोबॅक दिला किंवा शुटिंगची ऑफर दिली तर लगेच विश्वास ठेवू नका. कोणत्याही स्टुडिओत जाण्यापूर्वी त्याचा इतिहास आणि तेथील कामाची पद्धत तपासा. शक्यतो एकटे जाणे टाळावे. कॅनडिड फोटोंच्या नावाखाली तुमची प्रायव्हसी धोक्यात येत नाही ना, याची खात्री करा. जर कोणी पैशांची मागणी करत असेल किंवा ब्लॅकमेल करत असेल, तर त्वरित सायबर सेल किंवा पोलिसांशी संपर्क साधा.

## रोहिणी खडसेंनी चित्रा वाघ यांना पुन्हा डिवचलं

प्रतिनिधी २२ एप्रिल

**जळगाव :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी पुन्हा एकदा नाव घेता भाजप आमदार चित्रा वाघ यांचे कान टोचले आहे. ज्यांचा बुद्धीशी काडीचाही संबंध नाही अशा 'चित्रा'विचित्र लोकांनी बुद्धी विषयी न बोललं बरं अशी जोरदार टीका त्यांनी केली आहे. रोहिणी खडसे म्हणाल्या की, माझ्या वडिलांवर बोलण्याआधी लक्षात की ज्या पक्षात तुम्ही आमदार म्हणून मिरवत आहात. त्या पक्षाची पाळेमुळे घट्ट करण्यात माझ्या वडिलांचा वाटा आहे. आयत्या बिळावरील नागोबांनी जरा बुद्धीवर जोर देऊन बोलावं अशा इशारा त्यांनी दिला. काल चित्रा वाघ यांनी सोशल मिडीयावरती एक पोस्ट करून खडसेंना डिवचलं होतं, त्यावर आता रोहिणी खडसेंनी सणसणीत उत्तर दिलं आहे.

# 'भाजपा भगाओ, देश बचाओ!'

## व्हिडिओ शेअर करत हर्षवर्धन सपकाळांचा हल्लाबोल

प्रतिनिधी २२ एप्रिल

**मुंबई :** संसदेत महिला आरक्षणासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयक फेटाळलं गेल्यानं संतप्त झालेल्या सत्ताधारी भाजपनं काँग्रेससह ठाकरेंच्या शिवसेनेविरोधात वरळीत महिलांच्या भव्य निषेध मोर्चाचं आयोजन केलं होतं.या मोर्चासाठी मोठ्या प्रमाणावर महिलांची गर्दी झाल्याने मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली, यामुळं या कोंडीत अडकून पडलेल्या एका उच्चभ्रू मुंबईकर महिलेचा संताप अनावर झाला आणि तिनं थेट मंत्री गिरीश महाजन यांच्यावर संताप व्यक्त केला. यामुळे काही काळ गोंधळ निर्माण झाला होता.

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे. आता हा व्हिडीओ ट्विट करत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे.'महिलांच्या सशक्तीकरणाच्या नावाखाली राजकारण करणाऱ्या, आरक्षणाचा मुद्दा पुढे करून महिलांची दिशाभूल करणाऱ्या आणि त्यांना केवळ राजकीय साधन म्हणून वापरत खोटे नॅरेटिव्ह पसरवणा-या भाजपाचा खरा चेहरा या भगिणीने वरळीहून निघालेल्या मोर्चासमोर जाऊन उघडा पाडला आहे.महिलांच्या सशक्तीकरणाच्या नावाखाली राजकारण करणाऱ्या, आरक्षणाचा मुद्दा पुढे करून महिलांची दिशाभूल करणाऱ्या आणि त्यांना केवळ राजकीय साधन म्हणून वापरत खोटे नॅरेटिव्ह पसरवणा-या भाजपाचा खरा चेहरा या भगिणीने वरळीहून निघालेल्या मोर्चासमोर जाऊन उघडा पाडला आहे.

# इतिहासात प्रथमच महिलेने मंत्र्याला एवढ्या शिव्या दिल्या

## काँग्रेसचे मंत्री महाजनांच्या व्हायरल व्हिडिओवर भाष्य

प्रतिनिधी २२ एप्रिल

**मुंबई:** काँग्रेस नेते नाना पटोले यांनी मंत्री गिरीश महाजन यांना महिलेने केलेल्या कथित शिविगाळीवरून भाजपवर निशाणा साधला आहे. भाजपला सत्तेचा माज आला आहे. सत्तेचा उपयोग जनतेला त्रास देण्यासाठी होत असल्यामुळे एका महिलेने काल एका मंत्र्याला भररस्त्यात शिविगाळ केली. इतिहासात प्रथमच एखाद्या मंत्र्याला महिलेच्या एवढ्या शिव्या खाव्या लागल्या, असे ते म्हणालेत.

लोकसभेत महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक नामंजूर झाल्यानंतर भाजपने सोमवारी मुंबईत एका मोर्चाचे आयोजन केले होते. यावेळी मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. या कोंडीमुळे त्रस्त झालेल्या एका महिलेने मंत्री गिरीश महाजन यांच्यासमोर जाऊन आपला संताप व्यक्त केला. या घटनेचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी या व्हिडिओवरून सत्ताधारी भाजपवर टीकेची झोड उठवत पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच सीरियल लायर असल्याचा आरोप केला आहे.नाना पटोले म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच सीरियल लायर अर्थात अट्टल खोटारडे आहेत. अशा विधानावर आम्ही प्रतिक्रिया द्यावी असे वाटत नाही. खोटे बोलणाऱ्यालाच ते लागते. महिला विधेयकाविषयी ज्या पद्धतीने लोकांना भ्रमित करण्याचे काम सुरू आहे.

सप्टेंबर २०२३ मध्ये महिला आरक्षण विधेयक पारित झाले आहे. राष्ट्रपतींची त्यावर स्वाक्षरी झाली आहे. त्याचे नोटिफिकेशन जारी झाले आहे. हे विधेयक २०२४ मध्ये लागू करण्यास तुम्हाला कुणी रोखले होते. आज १८१ महिला सभागृहात पहायला मिळाल्या असत्या.सरकारने प्रथम सांगितले की, आम्ही जातनिहाय जनगणना करू. आता ते सांगत आहेत की, आता प्रथम आम्ही घरांची गणना करू. तुमच्याकडे महापालिका, नगरपंचायत, पंचायती, ग्राम पंचायत आदींमध्ये सर्व रेकॉर्ड आहे. त्यामुळे खोटे कोण बोलत आहे? बहुजनांवर सातत्याने अन्याय करणारी मानसिकता आज सत्तेत आहे. ही सत्तेतील मानसिकता बहुजनांच्या तोंडातील घास हिरावून घेण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे या खोटारड्या लोकांना जनतेने आता ओळखले आहे. भाजपला लोक आज कंटाळले आहेत.

### गिरिश महाजन यांनी पण दिले उत्तर

मोर्चाची वेळ आणि नियोजन चुकले का? असे विचारले असता गिरीश महाजन म्हणाले, नियोजन कुठेही चुकले नाही. सायंकाळी ५-५.३० ची वेळ होती ती आणि पोलिसांना आम्ही रीतसर याबद्दल माहिती दिली होती आणि परवानगी सुद्धा घेतलेली होती. आता मोर्चा रात्री तर काढू शकत नाही. त्यामुळे त्या महिलेने पोलिसांकडे तक्रार करायला पाहिजे होती. अशा पद्धतीची भाषा योग्य नव्हती. बाटली सुद्धा फेकून मारली. महिलांसाठीच हा मोर्चा होता. आंदोलन मोठी असतात तेव्हा काय काय होते ते माहीत आहे आपल्याला. थोडा सौम्य भाषेत सुद्धा राग व्यक्त करता आला असता, पण त्यांनी तसे केले नाही.

## नवरी-नवरदेवाची जिल्हाधिकारी कार्यालयात भटकंती...

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अकोला:** नवदाम्पत्य नवजीवनाचे स्वप्न रंगवते, लग्न झाल्यावर नवीन जीवनात काय करायचं आहे, याच प्लॅनिंग आधीच ठरवलं जात. सोलापूरचा वर आणि अकोल्याच्या वधूचा विवाह ठरला. नोंदणी विवाह करण्याचं दोन्ही परिवारात ठरले पण त्यामध्ये व्यत्यय आला कर्मचारी संपाचा.

अकोल्यातील नोंदणी कार्यालयात २१ एप्रिलच्या मुहूर्ताचा ऑनलाइन अर्जही करण्यात आला. मात्र हे लग्न ठरलेल्या वेळेत होऊ शकले नाही. आणि याला कारण ठरलं ते अकोला जिल्हाधिकारी कार्यालय मधील कर्मचाऱ्यांचा संप. लग्नासाठी जमलेली पाहुणे मंडळी संबंधित कार्यालयाच्या अधीक्षकांकडे गेली. पण आज हे लग्न होऊ शकत नाही. एवढंच उत्तर वऱ्हाडीना मिळालं, त्यामुळे व-हाडी मंडळी घेऊन आलेला नवरदेव आणि पाहुण्यांसोबत आलेली नवरी अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात नोंदणी विवाहासाठी अधिकाऱ्यांना भेटत फिरत होते. त्यांनी अकोला जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचीही भेट घेतली.. मात्र तरीही लग्नाळू दाम्पत्याला नोंदणी विवाहासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात चकरा माराव्या लागल्या.






CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## वसुंधरा दिन

पृथ्वी दिनासाठी जॉन मक्डॉनेल याने बनवलेला अनधिकृत ध्वज पृथ्वी दिन हा पृथ्वीच्या पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जागृती करण्यासाठी हा दिवस जगभर पाळण्यात येतो. आपली पृथ्वी ही सुमारे ४.५० अब्ज वर्षांपूर्वी तयार झाली. अमेरिकेत २२ एप्रिल रोजी हा दिन पाळला जातो, तर संयुक्त राष्ट्रे २० मार्च रोजी, म्हणजे सूर्य पृथ्वीच्या विषुववृत्ताच्या थेट समोर असण्याच्या दोन बिंदूपैकी एका बिंदूशी पोचण्याच्या दिवशी, संपातबिंदू पृथ्वी दिन पाळतात.

# जागतिक वसुंधरा दिन पर्यावरणीय संकल्पाचा मुहूर्त

संपूर्ण विश्वात पृथ्वी हा असा एकमेव ज्ञात ग्रह आहे जिथे जीवन अस्तित्वात आहे. पृथ्वीवर पाणी, हवा, तापमान आणि जैवविविधता यांचे अद्वितीय संतुलन आहे. सुमारे ४.५ अब्ज वर्षांचा इतिहास असलेली ही वसुंधरा अनेक भूगर्भीय आणि जैविक परिवर्तनातून आजच्या स्वरूपात आली आहे. या ग्रहाने असंख्य प्रजातींचा जन्म, उत्क्रांती आणि नाश अनुभवला आहे, तरीही जीवन टिकवून ठेवण्याची तिची क्षमता अद्वितीय आहे.

वसुंधरेच्या रक्षणाची गरज

आजच्या काळात वसुंधरेसमोर अनेक गंभीर आव्हाने उभी आहेत. हवामान बदल, ग्लोबल वॉर्मिंग, जैवविविधतेचा ऱ्हास, जलसंकट, जंगलतोड आणि प्रदूषण या समस्या दिवसेंदिवस तीव्र होत आहेत. विकास आणि पर्यावरणाचा ऱ्हास याबाबतीतही समतोल साधण्याची गरज निर्माण झाली आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या अहवालानुसार, जर ही स्थिती कायम राहिली, तर भविष्यात मानवी जीवनावर मोठे संकट येऊ शकते. त्यामुळेच वसुंधरेच्या रक्षणासाठी प्रत्येक व्यक्तीने सज्ज होणे अत्यावश्यक आहे.

मानवी भूमिका ;उपाययोजना

मानव समाजाने पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. पुनर्नवीनीकरण, ऊर्जा बचत, पाणी संवर्धन, वृक्षारोपण आणि शाश्वत विकास या उपाययोजना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. भारताने हरित क्रांती, धवल क्रांती, आणि निळी क्रांती यांसारख्या उपक्रमांद्वारे अन्न, दूध आणि मत्स्य उत्पादनात मोठी प्रगती केली आहे. मात्र, या विकासासोबत पर्यावरण संतुलन राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

परंपरेतील वसुंधरेचा सन्मान

भारतीय संस्कृतीत वसुंधरेला 'माता' मानले गेले आहे. संत परंपरेतही पर्यावरणाबाबत जागरूकता दिसून येते. संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात 'अवघे विश्वचि माझे घर' असे म्हणत सर्व सृष्टीला एक कुटुंब मानले आहे. तसेच संत तुकारामांनी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी' असे सांगत निसर्गाशी असलेले आपले नाते अधोरेखित केले आहे. ही शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे.

आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांचे योगदान

पर्यावरण संरक्षणासाठी अनेक जागतिक शास्त्रज्ञांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. अमेरिकन सागरी जीवशास्त्रज्ञ, निसर्गलेखिका आणि आधुनिक पर्यावरण चळवळीच्या जनक श्रीमती रॅशेल कार्सन यांनी त्यांच्या 'सायलंट स्प्रिंग' या ग्रंथात पर्यावरणीय प्रदूषणाचे गंभीर परिणाम मांडले. निसर्गात कशाचेही अस्तित्व एकाकी नसते, ही बाब त्यांनी सप्रमाण सिध्द केली आहे.

हवामान शास्त्राचे जनक श्री जेम्स हॅनसेन यांनी, हवामान बदल हे मानवापुढील सर्वात मोठे संकट असल्याचे स्पष्ट करुन हवामान बदलाच्या धोक्यांविषयी जगाला सतर्क केले.




वसुधैव कुटुंबकम भूमिका

२०२३ मध्ये भारतात पार पडलेल्या जी - २० शिखर परिषदेची मध्यवर्ती संकल्पना'वसुधैव कुटुंबकम' ही होती. याचा अर्थ संपूर्ण जग हे एक कुटुंब असून पर्यावरण संरक्षणासाठी सर्व देशांनी एकत्र येऊन कार्य करणे हीच काळाची गरज आहे. भारताच्या या भूमिकेमुळे जागतिक सहकार्याला नवे बळ मिळाले. पर्यावरणाचा ऱ्हास जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात झाला तरी त्याचा परिणाम जगाच्या अन्य भागावर होतो, ही बाब लक्षात घ्यायला हवी. पर्यावरण हा विषय भूभागांच्या सीमांचा , देशाच्या, धर्मांच्या, बंधनाचा नाही. तो अखिल मानव जातीच्या कल्याणाचा पाया आहे.

जलसाठ्याचा पुनर्विकास आवश्यक

जागतिक वसुंधरा दिन—पर्यावरणीय संकल्पाचा मुहूर्त—या विषयाची सुरुवात करताना एक साधी पण अत्यंत प्रभावी जाणीव लक्षात घ्यायला हवी, ती म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास थांबविणे. एक छोटेसे उदाहरण घेऊया, तुमच्या अवतीभवतीच्या एखाद्या तलावाचे निरीक्षण करा.कल्पना करा की तो कोरडा पडला.त्याच्या कोरडेपणामुळे कशा कशावर परिणाम होतो याचा विचार जरी केला तर पर्यावरणाचा ऱ्हासाचे किती वाईट परिणाम होतात, हे लक्षात येते.

उदाहरणार्थ कोरडा पडणारा एक तलाव वाचविणे हे केवळ जलस्रोत पुनर्जीवित करणे नसून संपूर्ण परिसंस्थेचा पुनर्जन्म घडविण्याचा शास्त्रीय प्रयत्न ठरतो. पाणी हे जीवनाचे मूलतत्त्व असल्याने जलसाठ्यांचे संगोपन केल्यास भूजल पातळी पुनर्भरण (ग्राऊंडवाटर रिचार्ज) होते, जलचक्र संतुलित राहते आणि परिसरातील सूक्ष्म हवामान (मायक्रोक्लायमेट) स्थिर होते. तलावाभोवती ओलावा वाढल्याने वनस्पती, पक्षी, कीटक व सूक्ष्मजीव यांची जैवविविधता नैसर्गिकरीत्या वाढते, ज्यामुळे अन्नसाखळी बळकट होते आणि परिसंस्थेचे संतुलन राखले जाते. अशा जलाशयांमुळे कार्बन शोषण (कार्बन सिक्वेस्ट्रेशन) सुलभ होऊन हवामान बदलाच्या परिणामांना आळा बसतो, तसेच मृदेची धूप कमी होऊन जमिनीची सुपिकता टिकून राहते. परिणामी, स्थानिक समुदायाला शाश्वत उपजीविका मिळून शाश्वत विकास साध्य होतो. पृथ्वीचे वैशिष्ट्य म्हणजे पंचमहाभूतांचे—पृथ्वी, जल, वायू, अग्नी आणि आकाश—समतोल सहअस्तित्व; त्यामुळे या घटकांचे संरक्षण म्हणजेच पर्यावरण संवर्धनाची मूळ संकल्पना होय. म्हणूनच एक तलाव वाचविणे म्हणजे केवळ पाणी साठवणे नव्हे, तर संपूर्ण वसुंधरेचे संतुलन जपण्याचा आणि भविष्यातील जीवन सुरक्षित ठेवण्याचा जागतिक स्तरावरील पर्यावरणीय संकल्पच होय.

माझी वसुंधरा ६.० अभियान

महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संरक्षणासाठी 'माझी वसुंधरा ६.०' या अभियानाच्या माध्यमातून व्यापक आणि समन्वित उपाययोजना राबविल्या आहेत. या अभियानात राज्यातील सर्व महापालिका, नगरपरिषद आणि ग्रामपंचायतींचा सक्रिय सहभाग निश्चित करण्यात आला असून, स्थानिक स्वराज्य संस्थांना पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी देण्यात आली आहे. पंचमहाभूतांच्या संकल्पनेवर आधारित या योजनेत पृथ्वी, जल, वायू, अग्नी आणि आकाश या घटकांचे संतुलन राखण्यावर भर दिला जातो. शासनाने वृक्षारोपण, जलसंधारण, सांडपाणी पुनर्वापर, कचरा व्यवस्थापन आणि हरित ऊर्जा वापर यांसारख्या उपक्रमांना प्रोत्साहन दिले आहे. कार्बन उत्सर्जन कमी करून हवामान बदलाचा प्रभाव कमी करण्यासाठी विविध हरित उपक्रम राबविण्यात येत आहेत. नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी ई-प्रतिज्ञा, जनजागृती मोहिमा आणि पर्यावरण दूत यांची संकल्पना राबविण्यात आली आहे. स्थानिक संस्थांनी केलेल्या कामांचे जिओ-टॅगिंग, ऑनलाइन नोंदणी आणि तृतीय पक्ष मूल्यांकन यामुळे पारदर्शकता सुनिश्चित केली जाते. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्थांना पुरस्कार देऊन स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यात आले आहे. शाळा व महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवून पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण केली जात आहे. शासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय साधून शाश्वत विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

प्लास्टिकमुक्ती, स्वच्छता अभियान आणि हरित परिसर निर्मिती यावर विशेष भर देण्यात आला आहे. पर्यावरण संरक्षणाला लोकचळवळीचे स्वरूप देत नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. या सर्व उपाययोजनांद्वारे महाराष्ट्र शासन पर्यावरण संतुलन राखण्यास आणि भावी पिढ्यांसाठी सुरक्षित व निरोगी वसुंधरा निर्माण करण्यास कटिबद्ध आहे.जागतिक वसुंधरा दिन हा केवळ एक दिवस नसून, तो आपल्याला निसर्गाशी असलेले नाते पुन्हा दृढ करण्याची संधी आहे. वसुंधरेचे रक्षण करणे म्हणजे आपल्या भविष्याचे रक्षण करणे होय. म्हणूनच 'जागतिक वसुंधरा दिनाला – वसुधैव कुटुंबकम भूमिकेत येऊ' हा संदेश प्रत्येकाच्या मनात रुजला पाहिजे.आपण प्रत्येकाने छोट्या-छोट्या कृतीतून पर्यावरणाचे संरक्षण केले, तरच ही सुंदर वसुंधरा पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित राहील.त्यामुळे आजचा दिवस पर्यावरणाच्या ऱ्हासाला पायबंद घालताना पर्यावरण निर्मितीच्या संकल्पना राबविण्यासाठी शपथ घेण्याचा आहे.

प्रवीण टाके,
उपसंचालक विभागीय माहिती कार्यालय कोल्हापूर

## 'विद्या धनं सर्वधनप्रधानम'

या सुभाषितात दडलेला अर्थ जितका साधा तितकाच गहन आहे. सर्व संपत्तींपैकी ज्ञान हीच सर्वश्रेष्ठ संपत्ती आहे, आणि या ज्ञानाचे सर्वात प्रभावी साधन म्हणजे पुस्तक. म्हणूनच जागतिक पुस्तक दिन हा केवळ औपचारिक उत्सव नसून वाचनसंस्कृतीचा जागर करणारा आणि पुस्तकांविषयीची आपली नाळ अधिक दृढ करणारा दिवस आहे.

याच अनुषंगाने, आपण छापील अक्षरे पवित्र मानतो. कारण ही अक्षरे केवळ शब्द नसतात, तर ती सत्य, ज्ञान आणि अनुभवांचे जिवंत रूप असतात. अंधारातून तेजाकडे नेणारे ग्रंथ हेच खरे गुरू आहेत. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करणारे, विचारांना दिशा देणारे आणि मनाला समृद्ध करणारे हे ग्रंथ आपले निःशब्द मित्र असतात.

पुढे पाहिले तर, पुस्तक हे भूतकाळ आणि भविष्यकाळ यांच्यामधील एक महत्त्वाचा दुवा आहे. इतिहासातील अनुभव, परंपरा आणि संस्कृती जपत असताना ते आपल्याला भविष्याचा विचार करण्याची प्रेरणा देते. त्यामुळेच मुद्रित अक्षरे ही सत्याचे आणि ज्ञानाचे विश्वसनीय स्रोत ठरतात आणि पुस्तक माणसाचे जीवन बदलण्याची ताकद ठेवते.

याच विचारांची जाणीव बालपणापासूनच होत असते. शाळा सुरू झाल्यावर नवीन पुस्तकांचा येणारा गंध, त्याची पाने उलटताना होणारा आनंद हे केवळ आठवणी नसून एक भावनिक नाते असते. त्या वयात पुस्तकांमधून मिळालेल्या शिकवणी आयुष्यभर साथ देतात. ‘जाने बिन मित्रता, पाहे बिन जल’ कधी करू नये यांसारख्या साध्या पण मूल्यवान गोष्टी पुस्तकांनीच बालमनावर कोरलेल्या असतात.

याच संदर्भात, प्रसिद्ध विचारवंत फ्रान्सिस बेकन यांनी म्हटले आहे, ‘वाचन माणसाला परिपूर्ण बनवते.’ हे वाक्य आजही तितकेच सत्य आहे. वाचनामुळे विचारांची परिपक्वता येते, व्यक्तिमत्त्व घडते आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. अनेक वेळा रद्दीतही अनमोल पुस्तके सापडतात, हेच दाखवते की ज्ञान कुठेही दडलेले असू शकते; फक्त ते शोधण्याची दृष्टी असावी लागते.

यामुळेच पुस्तकांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. पुस्तके संस्कृती आणि विचारांचे दरवाजे उघडतात. ती आपल्याला केवळ माहिती देत नाहीत, तर जगण्याची दिशा दाखवतात.

'शब्दचि आमुच्या जिवाचे जीवन, शब्दे वाटू धन जनलोका'

या ओळींप्रमाणे शब्द हेच खरे जीवन आहे, आणि त्या शब्दांचे भांडार म्हणजे पुस्तके. झेप घेणाऱ्या पंखांना ज्ञानाचे बळ देणारी ही पुस्तके जीवनात आनंदाचे सप्तरंग उधळतात. त्याचप्रमाणे, पुस्तके शिकवतात जगावे कसे आणि घडवावे कसे भविष्य. ती केवळ व्यक्ती घडवत नाहीत, तर समाजाचीही जडणघडण करतात. मराठी माणसाच्या वैचारिक, सामाजिक, आर्थिक, भावनिक आणि आध्यात्मिक वाढीत पुस्तकांचा मोठा वाटा आहे. घरच्या वातावरणातही याचे महत्त्व तितकेच अधोरेखित होते. टेबलावर ठेवलेले एखादे पुस्तकही वैचारिक आणि शैक्षणिक वातावरण निर्माण करते. आमच्या घरात पुस्तके कधीच कपाटात बंद ठेवण्यासाठी नसतात; ती नेहमी उघडी असतात, जशी विचारांची दारे उघडी असावीत. कदाचित तो पसारा वाटेल, पण तोच मुलांच्या कल्पनाशक्तीचा आणि ज्ञानाचा अवकाश असतो. पुस्तके जशी वाचायची असतात, तशीच ती जपायचीही असतात. याच ठिकाणी ग्रंथपालाची भूमिका महत्त्वाची ठरते. तो केवळ पुस्तकांचे जतन करणारा नसून वाचनसंस्कृतीचा वाहक असतो. योग्य पुस्तक योग्य वाचकापर्यंत पोहोचवणे हे त्याचे मोठे योगदान आहे.

दरम्यान, आजच्या डिजिटल युगात वाचनाची सवय कमी होत चालली आहे, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, एका विद्वानाने म्हटले आहे की, 'दररोज फक्त पाच मिनिटे जरी वाचन केले, तरी माणूस बुद्धिमान बनतो.' ही सवय लहानपणापासून लावली, तर त्याचे परिणाम आयुष्यभर दिसून येतात. म्हणूनच, वाचनसंस्कृती रुजवणे, ती वाढवणे, जपणे आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे हा जागतिक पुस्तक दिनाचा मुख्य हेतू आहे. या निमित्ताने आपण प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा, आपण वाचनाशी किती जोडलेले आहोत?

या प्रवासात, प्रकाशन क्षेत्रात काम करताना अनेक अनुभव मिळतात. जवळजवळ २०० पुस्तके प्रकाशित करण्याचा प्रवास हा केवळ व्यवसाय नसून एक साधना आहे. पुस्तकाचे ले-आउट, संपादन, डीटीपी, कव्हर डिझाइन, पुस्तकं प्रकाशित झाल्यानंतर त्याचे समीक्ष करताना वेळेचे भान राहत नाही.



सागर बाबाराव लोडम
गोकुळ कॉलनी, अकोला,
मो. ९८५०४७१५२०


# वसुंधरेची आर्त हाक ; विकासाच्या वाटेवर शाश्वतपणाचा ध्यास !

दरवर्षी २२ एप्रिल हा दिवस 'जागतिक वसुंधरा दिन' म्हणून साजरा केला जातो. हा केवळ दिनविशेष नसून पृथ्वीवरील जीवनाच्या अस्तित्वाशी निगडित असलेली एक गंभीर जाणीव आहे. मानवाने विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अभूतपूर्व विकास साधला असला तरी या विकासाच्या बदल्यात पृथ्वीच्या संसाधनांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. हवामान बदल, प्रदूषण, जंगलतोड, जैवविविधतेचा ऱ्हास, जलसंकट यांसारख्या समस्यांनी आज संपूर्ण जगाला वेढले आहे. अशा परिस्थितीत वसुंधरा दिन हा केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवस म्हणून पाहणे आवश्यक आहे. पृथ्वी ही आपली केवळ राहण्याची जागा नसून ती आपली 'आई' आहे, जी आपल्याला अन्न, पाणी, हवा आणि जीवन देत असते. त्यामुळे तिच्या रक्षणाची जबाबदारी ही प्रत्येकाची नैतिक कर्तव्य आहे.

वसुंधरा दिनाची सुरुवात १९७० साली झाली. पर्यावरणाच्या रक्षणासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचा हा एक मोठा जागतिक उपक्रम ठरला. सुरुवातीला काही देशांपुरता मर्यादित असलेला हा दिवस आज जगभरातील जवळपास सर्व देशांमध्ये साजरा केला जातो. या दिवसाच्या निमित्ताने पर्यावरण संवर्धनाचे विविध कार्यक्रम, मोहिमा, जनजागृती उपक्रम राबवले जातात. परंतु केवळ एक दिवस साजरा करून पर्यावरण वाचणार नाही, तर हा विचार आपल्या दैनंदिन जीवनात रुजवणे गरजेचे आहे.

आजच्या घडीला पर्यावरणीय संकटाचे स्वरूप अत्यंत भीषण झाले आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यामुळे नैसर्गिक संसाधनांचा अतिरेकाने वापर होत आहे. जंगलांची मोठ्या प्रमाणात तोड केली जात आहे, ज्यामुळे वन्यजीवांचे अधिवास नष्ट होत आहेत. नद्या, तलाव आणि समुद्र प्रदूषणाने ग्रासले आहेत. हवेत विषारी वायूंचे प्रमाण वाढले आहे. या सर्व घटकांमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे, ज्याला 'जागतिक तापमानवाढ' असे म्हणतात. या तापमानवाढीमुळे हिमनद्या वितळत आहेत, समुद्राची पातळी वाढत आहे आणि नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे मानवी जीवनच धोक्यात आले आहे. हवामान बदल हा आजच्या काळातील सर्वात गंभीर प्रश्न आहे. पावसाचे चक्र विस्कळीत झाले आहे. काही ठिकाणी अतिवृष्टी होत आहे, तर काही ठिकाणी दुष्काळाचे संकट निर्माण होत आहे. कृषी क्षेत्रावर याचा मोठा परिणाम होत आहे. शेतकऱ्यांना पिकांचे नुकसान सहन करावे लागत आहे. अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे पर्यावरणीय समस्यांचा परिणाम केवळ निसर्गावरच नव्हे, तर मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर होत आहे.

पर्यावरणाच्या ऱ्हासामागे मानवी हस्तक्षेप हा प्रमुख कारण आहे. 'विकास' या नावाखाली आपण निसर्गाचा विनाश करत आहोत. मोठमोठे प्रकल्प, धरणे, रस्ते, कारखाने यासाठी जंगलांची तोड केली जाते. नद्या वळविल्या जातात. खनिज संपत्तीच्या



उत्खननासाठी पर्वत उध्वस्त केले जातात. या सर्व प्रक्रियेमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडतो. निसर्गाच्या या असंतुलनाचा परिणाम शेवटी मानवावरच होतो. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यामध्ये समतोल साधणे अत्यंत आवश्यक आहे.

'शाश्वत विकास' ही संकल्पना याच पार्श्वभूमीवर पुढे आली आहे. शाश्वत विकास म्हणजे असा विकास, जो वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम करत नाही. म्हणजेच, नैसर्गिक संसाधनांचा वापर करताना त्यांचे संवर्धन आणि पुनर्निर्मिती यांचा विचार करणे आवश्यक आहे. ऊर्जा, पाणी, जमीन यांचा वापर मर्यादित आणि योग्य पद्धतीने करणे गरजेचे आहे. पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर, नवीकरणीय ऊर्जेचा अवलंब, कचऱ्याचे पुनर्वापर यांसारख्या उपाययोजना यासाठी महत्त्वाच्या आहेत. जैवविविधता ही पृथ्वीवरील जीवनाचा पाया आहे. विविध प्रकारचे वनस्पती, प्राणी, सूक्ष्मजीव यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो. परंतु मानवी क्रियांमुळे जैवविविधतेचा ऱ्हास होत आहे. अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे पर्यावरणीय संतुलन बिघडत आहे. त्यामुळे जैवविविधतेचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी जंगलांचे संवर्धन, वन्यजीव संरक्षण, नैसर्गिक अधिवासांचे जतन यावर भर देणे गरजेचे आहे.

जलसंकट ही आणखी एक गंभीर समस्या आहे. पाणी हे जीवनासाठी अत्यावश्यक आहे. परंतु आज अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. भूजलाचा अतिरेकाने वापर, पावसाच्या पाण्याचा अपुरा साठवण, नद्यांचे प्रदूषण यामुळे जलस्रोत आटत आहेत. त्यामुळे पाण्याचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. पावसाचे पाणी साठवणे, पाण्याचा योग्य वापर, जलप्रदूषण रोखणे यांसारख्या उपाययोजना करणे गरजेचे आहे.कचरा व्यवस्थापन हा देखील पर्यावरण संवर्धनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. प्लास्टिकचा वाढता वापर हा पर्यावरणासाठी मोठा धोका ठरला आहे. प्लास्टिक विघटनास खूप वेळ लागतो, त्यामुळे ते जमिनीवर, पाण्यात साचून राहते आणि प्रदूषण वाढवते. त्यामुळे प्लास्टिकचा वापर कमी करणे, पुनर्वापर करणे आणि पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करणे आवश्यक आहे. 'कमी करा, पुनर्वापर करा आणि पुनर्चक्रण करा' हा मंत्र अंगीकारणे गरजेचे आहे. पर्यावरण संवर्धनात शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी शिक्षण प्रणालीत पर्यावरण शिक्षणाचा समावेश करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच पर्यावरणाचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे. तसेच समाजातील प्रत्येक घटकाने पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे.


शासन आणि धोरणे यांचीही पर्यावरण संवर्धनात महत्त्वाची भूमिका आहे. पर्यावरणपूरक धोरणे राबवणे, प्रदूषण नियंत्रणाचे नियम कडक करणे, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे यासाठी शासनाने प्रभावी पावले उचलणे आवश्यक आहे. परंतु केवळ शासनाच्या प्रयत्नांवर अवलंबून राहून चालणार नाही, तर प्रत्येक नागरिकानेही आपल्या स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे आहे.

आजच्या काळात तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून पर्यावरण संवर्धन शक्य आहे. सौर ऊर्जा, वारा ऊर्जा, जल ऊर्जा यांसारख्या नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवणे गरजेचे आहे. ऊर्जा कार्यक्षम उपकरणांचा वापर, हरित इमारतींची उभारणी, स्मार्ट शहरांची संकल्पना यामुळे पर्यावरणावरचा ताण कमी होऊ शकतो. वसुंधरा दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने काही ठोस संकल्प करणे आवश्यक आहे. झाडे लावणे, पाणी वाचवणे, कचरा कमी करणे, पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे यांसारख्या लहान उपाययोजना देखील मोठा फरक घडवू शकतात. पर्यावरण संवर्धन ही केवळ जबाबदारी नसून ती आपल्या अस्तित्वाची गरज आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर पर्यावरणीय समस्या या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांशी निगडित आहेत. विकासाच्या प्रक्रियेत निर्माण होणारी विषमता, संसाधनांचे असमान वितरण, गरिबी, लोकसंख्येचा दबाव यामुळे पर्यावरणावर ताण वाढतो. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी समग्र दृष्टिकोन आवश्यक आहे, ज्यामध्ये सामाजिक न्याय, आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल साधला जाईल. शेवटी, वसुंधरा दिन हा आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो की, पृथ्वी ही आपली मालमत्ता नसून आपण तिचे केवळ पालक आहोत. पुढील पिढ्यांसाठी ही पृथ्वी सुरक्षित आणि समृद्ध ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. जर आपण आज योग्य पावले उचलली नाहीत, तर भविष्यातील पिढ्यांना गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. त्यामुळे आता वेळ आली आहे, की आपण विकासाच्या नव्या वाटा शोधू, ज्या पर्यावरणपूरक आणि शाश्वत असतील. वसुंधरेच्या

डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

## दिन विशेष

### लालगुडी जयरामन यांचा स्मृती दिन



लालगुडी जयरामन (१९३०–२०१३)हे एक दिग्गज भारतीय कर्नाटक व्हायोलिन वादक, गायक आणि संगीतकार होते. ज्यांना 'व्हायोलिन त्रिमूर्ती'पैकी एक मानले जाते. त्यांनी व्हायोलिन वादनात अभिनव शैली आणून भारतीय शास्त्रीय संगीतात मोलाची भर घातली. त्यांना पद्मभूषण (२००१) आणि पद्मश्री (१९७२) सारख्या प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते.

लालगुडी जयरामन यांचा जन्म १७ सप्टेंबर १९३० रोजी तामिळनाडूतील लालगुडी येथे जन्म. त्यांचे वडील लालगुडी व्ही.आर. गोपाला अय्यर हे स्वतः एक उत्कृष्ट संगीतकार होते. वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षी त्यांनी स्टेजवर सादरीकरण करण्यास सुरुवात केली. त्यांनी अनेक दिग्गज गायकांना व्हायोलिन साथ दिली.

संगीत शैली विलक्षण होती. लालगुडी यांनी व्हायोलिन वादनात स्वतःची एक वेगळी 'बाणी' (शैली) विकसित केली, जी रागातील भाव आणि लयीवरील प्रभुत्वासाठी ओळखली जाते. त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले. पद्मभूषण (२००१), पद्मश्री (१९७२), संगीत नाटक अकादमी पुरस्कार, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार - सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शन.त्यांच्या मुला-मुलीने, जी.जे.आर. कृष्णन आणि लालगुडी विजयलक्ष्मी, त्यांचा वारसा पुढे चालवला आहे. लालगुडी जयरामन यांचे निधन २२ एप्रिल २०१३ रोजी चेन्नई येथे निधन झाले.लालगुडी जयरामन यांनी केवळ व्हायोलिनवादनातच नाही, तर अनेक रचना करून कर्नाटक संगीताच्या भांडारात भर घातली आहे.लालगुडी जयरामन यांच्या प्रमाणे दक्षिण भारतीय संगीतकार, गायक यांनी देखील भारतीय संगीत क्षेत्रात नावलौकिक मिळवला. इतकेच नाही तर वैश्विक स्तरावर छाप पाडली. त्यात लालगुडी जयरामन होते हे विशेष.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## शिवरचा वंश मुरुमकार जेईई मेन्समध्ये चमकला; ओबीसी प्रवर्गात ऑल इंडिया रँक १४४२

**अकोला:** देशातील अत्यंत स्पर्धात्मक समजल्या जाणाऱ्या जेईई मेन्स २०२६ परीक्षेचा निकाल दि. २१ एप्रिल रोजी जाहीर झाला असून, शिवर येथील वंश रामेश्वर मुरुमकार या विद्यार्थ्याने उल्लेखनीय यश संपादन करत गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. वंश मुरुमकार याने हॅन्डी कॅफ्ट ओबीसी प्रवर्गातून ऑल इंडिया रँक १४४२ मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. त्याच्या या यशामुळे संपूर्ण शिवर परिसरात आनंदाचे वातावरण असून सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे. जय बजरंग उच्च माध्यमिक व माध्यमिक विद्यालय, कुंभारी या शाळेचा विद्यार्थी असलेल्या वंशने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सातत्याने अभ्यास करत हे यश मिळवले आहे. त्याच्या जिद्दीला आणि चिकाटीला यशाची जोड मिळाल्याने तो इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. आपल्या यशाचे श्रेय वंशने आई-वडील आणि शिक्षकवर्ग यांना दिले असून, त्यांच्या मार्गदर्शनामुळेच हे यश शक्य झाल्याचे त्याने नमूद केले.

# भागवत कुटूंबाची रुग्णसेवा कल्याणकारी- पालकमंत्री

## स्व.डॉ.अरुण भागवत यांच्या वत्सल सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे लोकार्पण

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अकोला:** आपल्या रुग्णसेवेने विदर्भात नावलौकिक प्राप्त करणारे स्व. डॉ अरुण भागवत यांची रुग्णसेवा रुग्णांसाठी निश्चितच संजीवनी होती.पंचेचाळीस वर्षाच्या शल्य चिकित्सेद्वारे रुग्णांना आरोग्य सेवा प्रदान करून आपल्या निस्वार्थ सेवेचा स्व डॉ अरुण भागवत यांनी परिचय दिला आहे. त्यांची ही परंपरा त्यांचे वैद्यकीय कुटुंब या नवीन वत्सल सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलच्या माध्यमातून पुढे नेत आहेत ही निश्चितच अभिनंदनिय बाब असल्याचे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री ना. आकाश फुंडकर यांनी केले. बिर्ला कॉलनी, उड्डाण पुलाजवळ, जठार पेठ येथे स्व डॉ अरुण भागवत यांच्या स्वप्नपूर्ती स्वरूपाच्या वत्सल सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचा स्थानांतर व लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न झाला.या लोकार्पण सोहळ्यात उद्घाटक म्हणून ना फुंडकर बोलत होते. आ रणधीर सावरकर यांचे अध्यक्षतेत संपन्न या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून आ नितीन देशमुख,आ साजिद खान पठाण, माजी मंत्री



गुलाबराव गावंडे, माजी आ गजानन दाळू गुरुजी, माजी आ गोपीकिशन बाजोरिया,माजी आ नारायणराव गव्हाणकर, माजी आ वसंतदादा खोटरे, शेतकरी नेते प्रकाशराव पोहरे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष धोत्रे,कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ शरदराव गडाख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ आरती कुलवाल, सनदी अधिकारी अनुपकुमार श्रीवास्तव राज योगिनी रुक्मिणी दीदी, याज्ञवल्क जिचकार, भारती विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ शहाजी देशमुख, बियाणे महामंडळाचे संचालक डॉ रणजीत सपकाळ, आयएमए चे मावळते अध्यक्ष डॉ संतोष कुमार सोमानी, नूतन अध्यक्ष डॉ रणजित देशमुख, मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष डॉ जयराज कोरपे सौ डॉ पद्मावती कोरपे,वत्सल सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलच्या संचालक डॉ कल्पना अरुण भागवत, डॉ नरेंद्र भागवत,डॉ नम्रता भागवत, डॉ अभिषेक भागवत, डॉ हिता भागवत आदी उपस्थित होते. दीप प्रज्वलन व मान्यवरांच्या स्वागतने या कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते यावेळी वत्सल सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे फीत कापून जल्लोषात उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविक गजाननराव चोपडे यांनी करून या वस्सल सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व भागवत कुटुंबीय यांची वैद्यकीय सेवा उपक्रमाची माहिती दिली. यावेळी मान्यवर व नागरिकांच्या उपस्थितीत भागवत कुटुंबाचे आधारवड स्व डॉ अरुण भागवत यांच्या जीवनपटाची चित्रपट दाखविण्यात आली. टाळ्यांच्या गजरात यावेळी या जीवनपटाचे उपस्थितांनी स्वागत केले. तसेच स्व डॉ अरुण भागवत यांना सामूहिक आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमात रुक्मिणी दीदी यांनी भागवत परिवाराच्या वैद्यकीय व आध्यात्मिक सेवा कार्याची माहिती दिली. डॉ स्व अरुण भागवत यांच्या पिंड हा अध्यात्मिक असून ते ब्रह्मकुमारीशी जुळलेले असल्याचे सांगितले. वैद्यकीय सेवेसमवेतच हा अध्यात्मिक वारसा त्यांचे कुटुंब अद्यापही चालवत असल्याचे सांगितले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात आ रणधीर सावरकर यांनी कुठलाही फंड प्राप्त न करता स्व. डॉ अरुण भागवत यांनी स्वतःच्या खर्चाने गावोगावी जाऊन आरोग्यदायी उपक्रम, शिबिरे आयोजित करून आपल्या मानवीय सेवा कार्याचा परिचय करून दिला. त्यांचा हा वारसा त्यांचे कुटुंबीय पुढे नक्कीच चालविणार अशी आशा व्यक्त करीत कुटुंबाच्या या सेवा उपक्रमास आपल्या शुभेच्छा प्रदान केल्यात. कार्यक्रमाच्या समाप्तीनंतर उपस्थित मान्यवरांनी रुग्णालयाची पाहणी करीत विविध दालनांची माहिती जाणून घेतली. आपल्या खुमासदार शैलीने या सोहळ्याचे संचालन कवीश्रेष्ठ अनंत खेळकर यांनी तर आभार भागवत कुटुंबाच्या वैद्यकीय तज्ञ डॉ नम्रता भागवत यांनी मानलेत. स्नेहभोजनाने या सोहळ्याची सांगता झाली. या कार्यक्रमात जिवन पाटील, प्रकाश पाटील धुळे, दशरथ जाधव नाशीक जयंत पाटील सातारा, बाबा बिडसे नाशीक समवेत जिल्ह्यातील उद्योग, शिक्षण, सहकार, वैद्यकीय व सामाजिक सेवा क्षेत्रातील मान्यवर महिला पुरुष मंडळी व भागवत कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सौ.दीप्ती अग्रवाल यांना 'राज्यस्तरीय कर्तृत्व महिला शिखर रत्न पुरस्कार



**अकोला:** महानगरातील रहिवासी सौ.दीप्ती अग्रवाल यांना सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बद्दल यंदाचा राज्यस्तरीय कर्तृत्ववान महिला शिखर पुरस्कार २०२६ ने गौरविण्यात आले. युवा विचारपीठ प्रतिष्ठानाच्या वतीने आयोजित या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून अप्पर पोलीस अधीक्षक बी.चंद्रकांत रेड्डी, महापौर सौ. शारदा खेडकर, अदिती अर्बनचे अध्यक्ष सुरेशराव देवकर, कालुराम फूडचे संचालक संजय रूहाटिया, पोलीस निरीक्षक सौ. मालती कायटे, प्राचार्य रामेश्वरजी भिसे, प्रा. प्रकाश डवले, कुणाल ढोमणे, आरटीओ अधिकारी सौ. त्रिवेणी कुणाल घोलप, सौ. अर्चना शर्मा, सौ. रश्मी खडसान, मानस शास्त्रज्ञ सौ. ऋतुंबरा धोत्रे, डॉ. प्रवीण अग्रवाल, सुभाष शेगोकार, मनोज देशमुख आदी उपस्थित होते.मान्यवरांच्या उपस्थितीत यावेळी सौ दीप्ती अग्रवाल यांना सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात विविधक्षेत्रांत ठसा उमटविणाऱ्या ५५ कर्तृत्ववान महिला आणि १५ सामाजिक महिला संस्थांना ही गौरवण्यात आले.सौ दीप्ती अग्रवाल या पेजंट ग्रूमिंग चे धडे घेतात. त्या स्वतः मिसेस महाराष्ट्र असून त्यांनी अनेक फॅशन शो मध्ये ज्युरी म्हणून भूमिका बजावली आहे.

## सीईओ अनिता मेश्राम यांना पितृशोक

**अकोला:** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांचे वडील भय्याजी वानखेडे यांचे २१ रोजी दुपारी अल्पशा आजारामुळे निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ९१ वर्ष होते. त्यांच्या पार्थिवावर २२ रोजी सकाळी हिंदू स्मशानभूमी, कैलास टेकडी, सिंधी कॅम्प येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.





अकोट ग्रामीण पोलिसांची कारवाई?..धारदार शस्त्र हातात घेऊन दहशत माजवणाऱ्या आरोपीला अटक..!

## एस.एस. खरोटे सुवर्णकार शोरूममध्ये सुरु स्कीमला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, गुरुपुष्यामृतसाठी शोरूम सज्ज

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अकोला :** शहरातील गांधी चौकातील नामांकित एस. एस. खरोटे सुवर्णकार प्रा. लि. शोरूम मध्ये सुरू असलेल्या स्कीमला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या तीन मजली शोरूममध्ये ग्राहकांसाठी सुरू करण्यात आलेल्या आकर्षक योजना जसे सोन्याच्या दागिन्यांवर १ टक्क्यांपासून मेकिंग चार्ज सुरू आणि जुन्या सोन्याच्या बदल्यात नवीन दागिने घेताना शून्य टक्के घट (नियम व अटी सह) ला ग्राहकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. ग्राहकांचा कल एस. एस. खरोटे सुवर्णकार प्रा. लि. शोरुमकडे वाढत आहे.

तसेच गुरूपुष्यामृत योग या गुरुवारी पुष्य नक्षत्र आल्यावर तयार होणारा एक अत्यंत शुभ आणि दुर्मिळ योग आहे जो सोने खरेदीसाठी



लाभदायक मानला जातो. या दिवसाला विशेष महत्व आहे या योगानिमित्त शोरूममध्ये नवीन दागिन्यांची आकर्षक आणि भव्य श्रृंखला सादर करण्यात आली आहे. ज्वेलरी क्षेत्रात अनेक दशकांपासून विश्वासार्ह सेवा देणाऱ्या या शोरूमचे संचालक शैलेश खरोटे आणि सुनील खरोटे यांनी सांगितले की, गुरूपुष्यामृत हा अत्यंत शुभ योग मानला जातो. या दिवशी सोने, चांदी, प्लॅटिनम व हिरे खरेदी करणे विशेष फलदायी ठरते, त्यामुळे ग्राहकांमध्ये खरेदीसाठी मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे. शोरूममध्ये पारंपरिक तसेच आधुनिक डिझाइनमधील दागिन्यांची समृद्ध श्रृंखला उपलब्ध असून, यामध्ये मंगळसूत्र, टेम्पल ज्वेलरी, रिअल डायमंड ज्वेलरी, रोज गोल्ड, प्लॅटिनम ज्वेलरी तसेच नवीन ट्रेंडनुसार



डिझाइन केलेले आकर्षक दागिने यांचा समावेश आहे. गुरूपुष्यामृत योगाच्या निमित्ताने ग्राहकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेत आपल्या आवडीचे दागिने खरेदी करावेत, असे आवाहन शोरूमच्या संचालकांनी केले आहे.

## बोरगाव आठवडी बाजारात मिळणार थंड पाणी

प्रतिनिधी २२ एप्रिल

**बोरगाव मंजू :** येथील आठवडी बाजारात येणाऱ्या नागरिकांसह बाहेरगावावरून बाजारासाठी येणाऱ्या नागरिकांची गत दशकांपासून भर उन्हाळ्यात मोफत तृष्णातृप्ती करण्यात येत आहे. पाणपोई लावून माणुसकी जोपासत तहानलेल्या माणसाची तहान भागवून खऱ्या अर्थाने समाजव्रत जोपासत जलसेवा हेच खरे सामाजिक कार्य आहे, असे प्रतिपादन मुर्तिजापूर नगरपरिषद बांधकाम सभापती संदीप सरनाईक यांनी व्यक्त केले.

स्थानिक बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष संजय वानखडे बोरगाव मंजूच्या वतीने आयोजित आठवडी बाजाराच्या दिवशी बाजारात येणाऱ्या नागरिकांनाव व्यापाऱ्यांना मोफत थंड पाणी पाणपोई

### सामाजिक कार्यकर्ते संजय वानखडेचा उपक्रम



शुभारंभप्रसंगी आयोजित कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बांधकाम सभापती संदिप सरनाईक हे होते तर प्रमुख उपस्थिती पोलिस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर लांडे, नगर परिषद सदस्या शुभांगी संदिप सरनाईक, ग्रामपंचायत सदस्य सुनील खेडकर, माजी पंचायत समिती सदस्य अशोक पाटील तायडे, ग्राम विकास अधिकारी आर. डी. काटे संजय रडके, संजय देशमुख, अर्जुन बारस्कर, आदी उपस्थित होते

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त ११ वर्षांपासून उन्हाळ्यात आठवडी बाजारात लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी, यासाठी सामाजिक कार्यकर्ते संजय वानखडे हे स्वखर्चाने दर मंगळवारी आठवडी बाजारात येणाऱ्या नागरिकांना थंड पाणी वाटप करण्याचा सामाजिक उपक्रम राबवतात. पोलिस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर लांडे म्हणाले, खऱ्या अर्थाने अशा सामाजिक उपक्रमांची आज गरज आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सामाजिक कार्यकर्ते संजय वानखडे यांचे स्वागत केले. यावेळी मुर्तीजापुर नगरपरिषद मध्ये शुभांगी सरनाईक नगरसेविका म्हणून व मुर्तीजापुर नगर परिषद बांधकाम सभापती झाल्याबद्दल संदीप सरनाईक यांचा सपत्नीक गावच्या वतीने सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन आयोजक संजय वानखडे यांनी केले, आभार पत्रकार तायडे गुरुजी यांनी केले.

## इयत्ता चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या वेळेत बदल करावा किंवा परीक्षा रद्द करावी

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अकोला:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्याकडून इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेचा २६ एप्रिल २०२६ रोजी पहिला पेपर ११ ते १२:२० व दुसरा पेपर दुपारी २ ते ३:३० च्या दरम्यान आयोजित केला आहे. मात्र अकोल्यात उन्हाची तीव्रता लक्षात घेता दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी नियोजित असलेली इयत्ता चौथी व सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विचार करता रद्द करण्यात यावी किंवा वेळेत बदल कराणेसंदर्भात संबंधितांना सूचना करण्याची विनंती भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या वतीने जिल्हाध्यक्ष मनीष गावंडे यांनी अकोला जिल्हाधिकारी यांना

### भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन





निवेदनाद्वारे केली आहे. अकोला जिल्ह्यात दिवसेंदिवस उन्हाची वाढती तीव्रता पाहता अकोला जिल्हाधिकारी यांनी शाळेची वेळ सकाळी ११ वाजेपर्यंत करण्यासंदर्भात आदेश दिले आहेत. अकोल्यासह विदर्भातही सुर्य आग ओकत आहे. मात्र महाराष्ट्रच्या भौगोलिक परीस्थितीचा विचार न करता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वेळापत्रकानुसार परीक्षा आयोजित झाल्यास विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहतील किंवा विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडण्याची संभावना असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.निवेदन देताना महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष गजानन सवडतकर, उपाध्यक्ष अल्केश खेडकर, सहसचिव अविनाश मते, वसिम मुजाहिद, अमित शिरसाट, मोहम्मद शोएब आदी उपस्थित होते.

### निधन वार्ता

**सचिन धाबे**



**अडगाव बु.:** येथील सचिन वसंत धाबे याचे सोमवार २० ला निधन झाले. त्यांचे मागे आई, दोन बहिणी व बराच मोठा आप्त परिवार आहे. ते आरोग्य कर्मचारी भिमकन्या धाबे यांचे सुपुत्र होत.

## पर्यावरण रक्षणासाठी 'अकोला गार्डन क्लब' चा पुढाकार; वृक्ष संवर्धनासाठी खरेदी केली 'इलेक्ट्रिक रिक्षा'

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अकोला:** शहरातील पर्यावरणाचे रक्षण आणि हिरवळ टिकवून ठेवण्यासाठी गेल्या ५२ वर्षांपासून अविरत कार्य करणाऱ्या 'अकोला गार्डन क्लब' ने एक स्तुत्य पाऊल उचलले आहे. संस्थेच्या वतीने वृक्ष संवर्धनासाठी एका नवीन इलेक्ट्रिक ऑटो-रिक्षाची खरेदी करण्यात आली असून, ही रिक्षा शहरात 'मोबाईल वॉटरिंग युनिट' म्हणून ओळखली जाणार आहे.

अकोला गार्डन क्लबच्या 'वृक्ष जल सेवा' उपक्रमांतर्गत ही इलेक्ट्रिक रिक्षा शहराच्या विविध भागांत लावलेल्या झाडांना पाणी घालण्याचे काम करणार आहे. अनेकदा झाडे लावली जातात, परंतु देखभालीअभावी ती जगू शकत नाहीत. ही अडचण दूर



करण्यासाठी संस्थेने स्वतःचे 'मोबाईल वॉटरिंग युनिट' कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे, पर्यावरणाचा विचार करून ही रिक्षा 'इलेक्ट्रिक' स्वरूपातील घेण्यात आली आहे, ज्यामुळे प्रदूषण होणार नाही.

संस्थेची ही मालमत्ता पूर्णपणे पर्यावरण संवर्धनासाठी वापरली जाणार असल्याने, या हरित वाहतूक साधनाच्या नोंदणी प्रक्रियेत सहकार्य मिळावे, अशी विनंती त्यांनी केली आहे.

अकोला गार्डन क्लब ही शहरातील सर्वात जुनी आणि समर्पित स्वयंसेवी संस्था आहे. १७ डिसेंबर १९७४ रोजी नोंदणी झालेली ही संस्था गेल्या पाच दशकांपासून अकोला शहराच्या हरितिकरणासाठी कटिबद्ध आहे. या नवीन उपक्रमामुळे शहराच्या पर्यावरण सेवेच्या क्षमतेत मोठी वाढ होणार असल्याचा विश्वास क्लबच्या कार्यकारी समितीने व्यक्त केला आहे.या उपक्रमासाठी वरिष्ठ सदस्य व माजी अध्यक्ष अजय सेंगर, विद्यमान अध्यक्ष संजय शर्मा, सचिव श्याम गोठफोडे, यांसह अकोला गार्डन क्लबच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे कौतुक होत आहे.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226
मॉ. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर, अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
> इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
> इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
> शालेय पोषण आहार
वैशिष्ट्ये :
> अनुभवी शिक्षकवृंद
> सुसज्ज पायाभूत ईमारत
> दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
> सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
> आनंददायी शिक्षण पध्दती
> CCTV ची सुविधा
> कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
> सुसज्ज प्रयोगशाळा

पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# फुलसावंगीतील जबरी चोरी प्रकरण उघड; तीन आरोपी जेरबंद

प्रतिनिधी २२ एप्रिल

**महागाव :** महागाव तालुक्यातील फुलसावंगी रोडवरील पेट्रोल पंपावर झालेल्या जबरी चोरी प्रकरणाचा छडा लावत स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ पथकाने तीन आरोपींना अटक केली आहे.

दि. 19 एप्रिल रोजी सकाळी पेट्रोल पंपावर काम करत असलेल्या फिर्यादी व साक्षीदारांवर आरोपींनी पेट्रोल भरण्याच्या कारणावरून वाद घालत गट्टू व फरशीने हल्ला केला. त्यानंतर मारहाण व शिवीगाळ करून फिर्यादीच्या खिशातील 11 हजार



रुपयांची रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावून आरोपी फरार झाले होते.

या प्रकरणी महागाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे खडका हायवे पुलाजवळ सापळा रचून आरोपींना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये विकास ऊर्फ विक्की सुभाष देवकर (23), अजय ऊर्फ जिवा बळीराम बोक्से (23) व रामदास ऊर्फ रामू सिन्ना पवार (22, सर्व रा. काळी टेंभी, ता. महागाव) यांचा समावेश आहे. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व सायबर सेलच्या पथकाने केली.

# 34 मुली बेपत्ता प्रकरण : भाजपात संभ्रम, आमदार तोडसामांनी केले खंडन

प्रतिनिधी २२ एप्रिल

**यवतमाळ :** राळेगाव तालुक्यात मुलींच्या कथित तस्करीच्या मुद्द्यावरून निर्माण झालेल्या वादाला आता राजकीय वळण मिळाले असून भाजपातच वेगवेगळे सूर उमटताना दिसत आहेत.

भाजपाचे जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चौहान यांनी हा प्रकार समोर आणत गंभीर आरोप केले होते. त्यानंतर मंत्री अशोक उईके यांनीही या विषयावर भाष्य करून प्रकरणाची दखल घेतली होती. मात्र, या सर्व दाव्यांचे भाजपाचे आमदार प्रा. राजू तोडसाम यांनी अधिकृत माहितीच्या आधारे खंडण केले आहे.

गेल्या दोन दिवसांत प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियावर ३४ आदिवासी मुलींचे अपहरण, विक्री किंवा अत्याचार झाल्याच्या बातम्यांनी मोठी खळबळ उडवली होती. या पार्श्वभूमीवर आमदार तोडसाम यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांशी संपर्क साधून प्रकरणाची सविस्तर माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी माध्यमांसमोर भूमिका स्पष्ट करत, या बातम्या दिशाभूल करणाऱ्या असल्याचे ठामपणे सांगितले.

तोडसाम यांच्या मते, व्हायरल होत असलेले व्हिडिओ आणि संदेश हे मानवी तस्करीशी संबंधित नसून वैयक्तिक संबंधांशी निगडीत प्रकरणे आहेत. २०२५ ते २०२६ या कालावधीत एकूण ६३ घटनांची नोंद झाली असली तरी त्यापैकी केवळ ३ प्रकरणेच प्रत्यक्षात सत्य असल्याचे निष्पन्न झाले आहे. उर्वरित घटनांचा संदर्भ वेगळा असून त्यात 'तस्करी'चा कोणताही प्रकार आढळलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

विशेष म्हणजे, चर्चेत आलेले एक प्रकरण हे अल्पवयीन मुलगी आणि त्याच समाजातील एका व्यक्तीच्या विवाहाच्या प्रयत्नाशी संबंधित असल्याचे समोर आले आहे. संबंधित व्यक्तीची पहिली पत्नी मृत्यूमुखी पडल्याने तो पुनर्विवाह करू इच्छित होता. त्यामुळे हे प्रकरण वैयक्तिक स्वरूपाचे असून त्याचा मानवी तस्करीशी संबंध जोडणे चुकीचे असल्याचे तोडसाम यांनी नमूद केले.

दरम्यान, जिल्हाध्यक्ष चौहान आणि मंत्री उईके यांनी केलेल्या वक्तव्यांमुळे या प्रकरणाला सुरुवातीला वेगळे स्वरूप प्राप्त झाले होते. मात्र, आमदार तोडसाम यांच्या खुलाशानंतर या दाव्यांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे भाजपात अंतर्गत मतभेद असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

या सर्व घडामोडींमुळे आदिवासी समाजाची प्रतिमा मलिन होत असल्याची खंत व्यक्त करत, नागरिकांनी अफवा आणि अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन आमदार तोडसाम यांनी केले आहे. तसेच, कोणतीही संवेदनशील माहिती प्रसारित करताना जबाबदारीने वागण्याची गरज असल्याचेही ते म्हणाले.

# पीक विमा भरपाईतून यवतमाळ वगळल्याने संताप; हस्तक्षेपाची मागणी

प्रतिनिधी २२ एप्रिल

**दारव्हा :** राज्यातील प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत जाहीर झालेल्या भरपाईतून यवतमाळ जिल्हा वगळण्यात आल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी पसरली आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता व भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी पुढे येत आहे.

राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी पहिल्या टप्प्यात सुमारे १,२९२ कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. मात्र या यादीत यवतमाळचा समावेश नसल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. विशेष म्हणजे, शेतकरी आत्महत्याग्रस्त म्हणून ओळख असलेल्या या जिल्ह्याला मदतीपासून



वंचित ठेवल्याची भावना व्यक्त होत आहे.

मागील खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे सोयाबीन, तूर व कापूस पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. अनेक भागांत उत्पादन घटले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत विमा भरपाईची अपेक्षा असताना यवतमाळला वगळण्यात आल्याने नाराजी अधिक तीव्र झाली आहे.

दरम्यान, पहिल्या टप्प्यात ३१ जिल्ह्यांना मदत मिळाली असून नांदेड जिल्हा येथे सर्वाधिक ८१३ कोटी रुपयांची भरपाई जाहीर करण्यात आली आहे. दुसऱ्या टप्प्यात कापूस व तूर पिकांसाठी मदत जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर बहुजन मुक्ती पार्टी च्या वतीने मुख्यमंत्री व कृषिमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. कोणतीही तांत्रिक अडचण असल्यास ती दूर करून यवतमाळ जिल्ह्याचा पीक विमा यादीत तातडीने समावेश करावा, अन्यथा राज्यभर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

लोकसभा अध्यक्ष (यवतमाळ-वाशीम) बिमोद मुधाने यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी प्रवीण खोडे पाटील, गुणवंत शेंदूरकर, रवि मनवर, रमेश ढगे, प्रशांत ठाणे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# १० लाखांचा बनावट मद्यसाठा जप्त

प्रतिनिधी २२ एप्रिल

**पांढरकवडा :** राज्य उत्पादन शुल्क पंढरकवडा पथकाने आज एक मोठी कारवाई करत, पंढरकवडा तालुक्यातील सायखेडा गावात १० लाख रुपयांहून अधिक किमतीचा बनावट मद्यसाठा जप्त केला. महिंद्राच्या सुप्रो मॅक्सी मिनी ट्रकमध्ये आणि शेतातील टिनशेडमध्ये ठेवलेल्या देशी व विदेशी मद्याच्या बाटल्यांचे मोठे साठे पोलिसांच्या हाती लागले. कारवाईत ४,००० नग देशी दारूच्या ९० मिलीच्या बाटल्या, २०० नग बॉबी संत्रा, १०,५०० नग रूपेश संत्रा, तसेच विदेशी दारू रॉयल स्टॅगचे ४८ नग बाटल्या जप्त करण्यात आले. याव्यतिरिक्त एक मोबाईल फोनसह किमतीचा एकूण मुद्देमाल १०,१२,५६०/- मिळून आला. आरोपी कमलेश अनिल मुजारीया याला अटक करण्यात आली असून, त्याच्यावर महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ च्या विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवला आहे. मद्यसाठा पुरवठा करणारे आणि वितरीत करणारे आरोपी फरार आहेत, ज्यांचा तपास सुरू आहे. सदर कारवाई डॉ. राजेश देशमुख, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांच्या आदेशानुसार, तसेच सह-आयुक्त प्रसाद सुर्वे आणि विभागीय उप-आयुक्त पराग नवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# अठरापगड समाज एकत्र आणण्यासाठी प्रबोधनाची गरज : नगराध्यक्षा तेजश्री जैन

प्रतिनिधी २२ एप्रिल

**उमरखेड :** अठरापगड जाती-धर्मातील बहुजन समाजाला एकत्र आणून सामाजिक जागृती घडविणाऱ्या प्रबोधन कार्यक्रमांची आजच्या काळात नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन उमरखेड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा तेजश्री जैन यांनी केले.

त्या प्रियदर्शी सम्राट अशोक चॅरिटेबल ट्रस्ट तथा जेतवन महिला धम्म प्रसारक मंडळ यांच्या वतीने आयोजित प्रबोधनात्मक गीत गायन व गुणवंत सत्कार कार्यक्रमात, राजे संभाजीनगर (बोरबन, उमरखेड) येथे बोलत होत्या.



यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले ज्ञानेश्वर डोईफोडे यांनी युवकांना महापुरुषांच्या विचारांचा अंगीकार करून विविध क्षेत्रात यश संपादन करण्याचे आवाहन केले. जिजाऊ ब्रिगेड च्या सरोजताई देशमुख यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला माजी नगरसेवक गजेंद्र ठाकरे, बांधकाम सभापती प्रकाश शिकारे, आरोग्य सभापती विरेंद्र खंदारे, सामाजिक कार्यकर्ते राहुल काळबांडे, मराठा सेवा संघ चे प्रवीण सूर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर शिवरंजन म्युझिकल ग्रुप चे गायक शिवशंकर वैद्य व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रबोधनात्मक गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निखिल थोरात यांनी केले, सूत्रसंचालन प्रशिक नंदुरकर यांनी तर आभार आम्रपाली प्रदीप लोकरे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ट्रस्टचे अध्यक्ष विद्वान केवटे, कोषाध्यक्ष संभाजी पाईकराव तसेच भारतीय विद्यार्थी मोर्चा आणि संबंधित संस्थांच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमाबद्दल सर्वत्र कौतुक व्यक्त करण्यात येत आहे.

# बँकेतील गर्दीचा फायदा; बॅग कापून ५० हजारांवर महिला चोरट्यांचा डल्ला

प्रतिनिधी २२ एप्रिल

**मारेगाव :** येथील सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखेत भरदिवसा घडलेल्या चोरीच्या घटनेने खळबळ उडाली आहे. बँकेतील गर्दीचा फायदा घेत दोन अज्ञात महिला चोरट्यांनी एका इसमाच्या बॅगला ब्लेडने चिरा मारून ५० हजार रुपयांची रोकड लंपास केली.

मिळालेल्या माहितीनुसार, राहुल किसन भरडे (रा. डोमा, जि. चंद्रपूर) हे मित्र पियुष वैद्य याच्यासह बँकेत पैसे काढण्यासाठी आले होते. त्यांनी ५० हजार रुपये काढून ते आपल्या बॅगमध्ये ठेवले. उर्वरित रक्कम काढण्यासाठी पॅन कार्ड लिंक आवश्यक असल्याने दोघे झेरॉक्स काढण्यासाठी बाहेर गेले.

झेरॉक्स करून पुन्हा बँकेत आल्यानंतर काही वेळाने राहुल यांनी बॅग तपासली असता, बॅगच्या आतील बाजूस चिरा मारलेला दिसून आला. त्यातील ५० हजार रुपयांची रोकड (५०० रुपयांच्या नोटांचे पुडके) अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याचे निदर्शनास आले.

संशय आल्याने बँकेचे सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असता, तोंडाला स्कार्फ बांधलेल्या दोन महिला संशयास्पद हालचाली करताना दिसून आल्या. त्या राहुल यांच्या मागोमाग फिरत असल्याचे दिसून आले असून, त्यांनीच चोरी केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

घटनेनंतर तत्काळ तक्रार दाखल होऊ शकली नव्हती. अखेर २१ एप्रिल रोजी राहुल भरडे यांनी मारेगाव पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली. त्यावरून अज्ञात महिलांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# घरफोडीचा गुन्हा उघड; २१ लाखांचे दागिने जप्त, दोघे ताब्यात

प्रतिनिधी २२ एप्रिल

**यवतमाळ :** जिल्ह्यात वाढत्या घरफोडीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेने तपासातून मोठा गुन्हा उघडकीस आणला. मारेगाव येथील घरफोडी प्रकरणात दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्या ताब्यातून सुमारे २१ लाख ३७ हजार रुपयांचा सोन्या-चांदीच्या दागिन्यांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मारेगाव येथील रहिवासी सुशिल जगेंवार यांनी ७ एप्रिल २०२६ रोजी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. अज्ञात इसमांनी त्यांच्या घरात प्रवेश करून सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेल्याचे त्यांनी सांगितले. या तक्रारीवरून मारेगाव पोलीस ठाण्यात




गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असताना पथकाला गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार, दोन अल्पवयीनांनी ही चोरी केली असून, त्यांनी चोरीतील दागिने पुसद येथील व्यक्तीमार्फत उमरखेड येथील सराफाकडे विक्रीसाठी दिल्याचे निष्पन्न झाले. पथकाने तात्काळ कारवाई करत संबंधित अल्पवयीनांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली देत नागवाडी (ता. पुसद) येथील नथ्थु कुरकुटे व दत्ता कुरकुटे यांच्या माध्यमातून दागिन्यांची विक्री केल्याचे सांगितले. यानंतर पथकाने पुसद येथे जाऊन स्थानिक पोलिसांच्या मदतीने दत्ता कुरकुटे याला ताब्यात घेतले. तसेच विविध प्रकारचे सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण २१,३७,७७१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त केलेला मुद्देमाल १०० टक्के हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तसेच यवतमाळ-पुसद उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बिजे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्ता पेंडकर, धिरज बांडे, पोलीस उपनिरीक्षक धनराज हाके, शरद लोहकर यांच्यासह मुन्ना आडे, संतोष भोरगे, सुनील खंडागळे, सुधीर पांडे, निलेश निमकर, सुधीर पिदुरकर, तेजाब रनखांब, सुभाष जाधव, कुणाल मुडेकार, रमेश राठोड, सलमान शेख, रजनिकांत मडावी, सुनील पंडागळे, राजेश जाधव, रविंद्र श्रिरामे आणि सतीश फुके आदी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत ही कारवाई केली.

# शासकीय कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप

## कामकाज ठप्प, नागरिकांची गैरसोय

प्रतिनिधी २२ एप्रिल

**उमरखेड :** तालुक्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचारी, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवार (दि. 21 एप्रिल) पासून बेमुदत संप पुकारला आहे. या आंदोलनामुळे उमरखेड तहसीलमधील बहुतांश शासकीय कामकाज ठप्प झाले असून, गरजू नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

सुधारित राष्ट्रीय निवृत्ती योजनेची अंमलबजावणी, वाहनचालक व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या भरतीवरील बंदी उठविणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करणे, रिक्त पदे भरणे, तसेच निवृत्तीचे वय 60 वर्षे करणे आदी प्रमुख मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप कर्मचारी समन्वय समितीने केला आहे.

> "पंचायत समिती अंतर्गत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संपात सहभागी होणार याबाबत कोणतीही पूर्वसूचना मिळालेली नाही."
> - विजय बेतेवाड, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती उमरखेड




या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आंदोलनात सहभागी झाले असून उमरखेडमधील कर्मचाऱ्यांनीही त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.

संपामुळे महसूल, शिक्षण, पंचायत समिती आदी विभागांचे दैनंदिन कामकाज विस्कळीत झाले आहे.

उन्हाच्या तीव्रतेत कामानिमित्त आलेल्या नागरिकांना कार्यालयाबाहेर प्रतीक्षा करावी लागत असून, अनेकांची कामे रखडली आहेत.

# यवतमाळ जिल्ह्याला पीक विम्यातून वगळल्याचा प्रश्न; शेतकरी संघर्ष समितीचा इशारा

प्रतिनिधी २२ एप्रिल

**पुसद :** शेतकरी संघर्ष समितीचे पदाधिकारी व महसूल मंडळ शेंबाळपिंपरी येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने मंगळवार, २१ एप्रिल रोजी यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय भाऊ देशमुख यांच्या दिग्रस येथील निवासस्थानी भेट घेऊन महत्त्वपूर्ण निवेदन सादर केले.

या निवेदनात, पीक विमा कंपनी व संबंधित यंत्रणांच्या हलगर्जीपणामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काच्या पीक विमा मोबदल्यापासून वंचित ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला. विशेष म्हणजे,



यवतमाळ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होऊनही राज्य व केंद्र शासनाने आर्थिक मदत दिलेली असताना, पीक विमा योजनेतून जिल्ह्याचे नाव वगळण्यात आल्याबद्दल संताप व्यक्त करण्यात आला.

इतर जिल्ह्यांच्या तुलनेत यवतमाळ जिल्ह्यात अधिक नुकसान झाले असताना देखील विमा कंपनी व संबंधित यंत्रणांनी जिल्ह्याचा समावेश न करणे हा अन्यायकारक निर्णय असल्याचे शिष्टमंडळाने नमूद केले. यासंदर्भात तात्काळ दखल घेऊन यवतमाळ जिल्ह्याचा पीक विमा योजनेत समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली.

जर संबंधित प्रशासनाने त्वरीत कारवाई करून यवतमाळ जिल्ह्याचा समावेश केला नाही, तर शेतकरी संघर्ष समिती व सर्व नुकसानग्रस्त शेतकरी यांच्या वतीने सनदशीर मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला.

निवेदन देताना उपस्थित जैनुल सिद्दीकी, रामकृष्ण चंदेल, सरपंच तथा प्रशासक रविंद्र महल्ले, दिलीपराव देशमुख, रेणुकादास जोशी, गुलाबराव वाहुळे, प्रदीप देशमुख (सरपंच तथा प्रशासक, दगड धानोरा), विलासराव वानखेडे (जगापुर), गणेश कांबळे (हिवळणी पा.), मुज़फ्फरोदीन सिद्दीकी, नसरुल्ला पठाण (ईसापूर धरण) व इतर शेतकरी बांधव उपस्थित होते.

# ब्राह्मणगाव शाळेत चौथीच्या विद्यार्थ्यांना निरोप

प्रतिनिधी २२ एप्रिल

**उमरखेड :** तालुक्यातील ब्राह्मणगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय मराठी प्राथमिक शाळेत इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहपूर्ण निरोप समारंभ उत्साहात पार पडला. दि. 20 एप्रिल रोजी आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना प्रेरणादायी वातावरणात निरोप देण्यात आला.

यावेळी शाळेचे माजी विद्यार्थी व विद्यार्थीनिष्ठ शिक्षक तानाजी मार्लेवाड आणि त्यांचे सुपुत्र डॉ. वेदांत मार्लेवाड यांनी सामाजिक बांधिलकी जपत शाळेला 51 हजार रुपयांची देणगी दिली. तसेच कृषी सेवा केंद्राचे संचालक राजकुमार विनकरे यांनी खत निर्मिती कंपनीच्या सीएसआर निधीतून शाळेसाठी एक कपाट, पाच खुर्च्या, एक टेबल आणि ग्रंथालयासाठी 50



पुस्तके उपलब्ध करून दिली. त्यांच्या या योगदानाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्राह्मणगावचे सरपंच परमात्मा गरुडे होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर पेंटेवाड, उपाध्यक्षा सोनाली आडबे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष अशोक निमलवाड, मुख्याध्यापक परमेश्वर बिरादार, तसेच सदस्य कुंदीप हुलकाने, ईबादुल्ला पठाण, प्रकाश साळेकर, मनीषा पावडे, सुनिता शिरल्लू, दिगंबर दंडगे आणि केंद्रप्रमुख शिवाजी पवार आदी उपस्थित होते.

समारंभात चौथीतील विद्यार्थ्यांना स्नेहपूर्ण व प्रेरणादायी निरोप देण्यात आला. तसेच समाजाभिमुख कार्य करणाऱ्या दात्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी व सत्कारमूर्तींनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन डुबेवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक मीराताई कदम, जयश्री जगळपुरे, मीनाक्षी कर्नेवाड, सुमन कोशलवार, रामकिशन केंद्रे व गजानन चंदापुरे यांनी परिश्रम घेतले.

# सिटी न्यूज अमरावती

बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## 'मिशन लक्ष्यवेध' अंतर्गत सोमवारी कुस्ती, वेटलिफ्टिंगची निवड चाचणी

**अमरावती:** क्रीडा व युवक सेवा संचालनालयातर्फे 'मिशन लक्ष्यवेध' ही धोरणात्मक योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत कुस्ती आणि वेटलिफ्टिंग या खेळांसाठी अमरावती येथील विभागीय क्रीडा संकुल येथे खेळाडूंची निवड चाचणी सोमवार, दि. २७ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आली आहे. यात निवड झालेल्या खेळाडूंना निवासी स्वरूपात दर्जेदार व तंत्रशुद्ध क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, निवास आणि भोजन व्यवस्था, क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य, देश-विदेशातील क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागाची संधी, शासन मान्यतेनुसार वैद्यकीय विमा सुरक्षा आदी सोयी-सुविधा मिळणार आहे. निवड चाचणीसाठी वयोमर्यादा ही दि. ३१ डिसेंबर रोजी २५ वर्षांखालील मुले व मुली असून खेळाडू महाराष्ट्र राज्यातील असावा. राज्यस्तरावरील पदक प्राप्त किंवा राष्ट्रीयस्तरावरील सहभागी खेळाडू हे निकष आहेत.

## नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी एकत्रित सेवा उपक्रम- आ. रवी राणा

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अमरावती:** आज अध्यक्ष विधानसभा आश्वासन समिती विधानभवन आमदार रवी राणा यांनी सर्व शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभ नागरिकांना 'एकाच छताखाली' उपलब्ध करून देण्यासाठी विशेष शिबिर राजस्व अभियान राबविण्यात यावे. या संबंधाने प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश दिले. यासंदर्भात विशेष शिबिराचे आयोजन दिनांक २८ एप्रिल रोजी करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

अमरावती तहसील कार्यालय येथे आयोजित बैठकीत आमदार राणा यांनी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांचा आढावा घेत नागरिकांना योजनांचा लाभ मिळवताना होणारी गैरसोय दूर करण्यावर भर दिला. तसेच लाभार्थ्यांची नोंदणी प्रक्रिया सुलभ व जलद करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना दिल्या.




बैठकीस उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, भातकुली तिवसा चे उप विभागीय अधिकारी दराडे, तहसीलदार मांडवे, भातकुलीचे तहसीलदार, गटविकास अधिकारी, तसेच नोंदणी व मुद्रांक विभाग, जिल्हा निबंधक कार्यालय, नगरपालिका, कृषी, पशुसंवर्धन, महिला व बालविकास, आरोग्य, ग्रामीण पाणीपुरवठा आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी विविध योजनांची माहिती, अर्ज प्रक्रिया आणि लाभ वितरण एकाच ठिकाणी करण्यासाठी समन्वय साधण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः शेतकरी, महिला, युवक व सर्वसामान्य नागरिकांना शासकीय योजनांचा त्वरित लाभ मिळावा, यासाठी प्रशासनाने सक्रिय भूमिका घ्यावी, असेही आमदार राणा यांनी नमूद केले. तसेच आगामी विशेष शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून काम करावे, अशा सूचनाही बैठकीत देण्यात आल्या. या बैठकीस युवा स्वाभिमान पार्टीचे पदाधिकारीही मंगेश पाटील इंगोले, उमेश ढोणे, आशिष कावरे, देवानंद राठोड, उमेश डकरे, अजय घुले, राजू,व ओंकार , विलास वाडेकर, आदी पस्थित होते.

## शोभायात्रेत आमदार सुलभा खोडके यांनी केली विश्वमांगल्याची प्रार्थना

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अमरावती :** भगवान परशुराम जयंती वैशाख शुक्ल तृतीयेला म्हणजेच अक्षय्य तृतीयेला साजरी केली जाते. भगवान परशुरामांनी भगवान शिवशंकरांची कठोर तपश्यचर्या करुन अनेक दिव्य अस्त्रे आणि विद्या आत्मसात केल्यात. परशुराम हे ' अष्टचिरंजीवी ' पैकी ( अमर ) एक मानले जातात. त्यांचे मूळ नाव ' राम ' होते, परंतु भगवान शिवाने दिलेला 'परशु ' या शस्त्रामुळे त्यांना ' परशुराम ' ( परशु धारण करणारा राम ) म्हटले गेले. भगवान परशुराम हे हिंदू धर्मातील एक प्रमुख दैवत असून, त्यांना भगवान विष्णुचा सहावा अवतार मानले जाते. ते माता रेणुका आणि ऋषी जमदग्नी यांचे चिरंजीव होते. ज्यांनी



पित्याची आज्ञा शिरसावंद्य मानून ती आज्ञा पालन करण्यासाठी कठोर पाऊल उचलले होते. अशी त्यांची कथा प्रसिद्ध आहे. अन्यायाविरुद्ध लढणारे ऋषी म्हणून परशुराम भारतीय संस्कृतीत अत्यंत महत्वाचे स्थान ठेवतात. भगवान परशुरामांनी सदैव गुरु आणि आई - वडिलांच्या आज्ञाचे पालन केले. भगवान परशुराम हे भारतातील ऋषी परंपरेचे मार्गदर्शक मानले जातात. असे प्रतिपादन आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले.रविवार दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी त्या भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अमरावती येथील राजकमल चौक येथे भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्त आयोजित शोभयात्रेचे आगमन झाले असता आमदार - सौ. सुलभाताई खोडके व आमदार संजय खोडके यांनी भगवान परशुराम यांच्या प्रतिमेस वंदन - पूजन - नमन करीत त्यांच्या प्रतिमेस माल्यार्पण केले. यावेळी आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी भगवान परशुराम यांच्या प्रतिमे चरणी विश्वमांगल्याची प्रार्थना केली.भगवान परशुराम तसेच गौमातेच्या सन्मानार्थ काढण्यात आलेल्या शोभायात्रेत त्यांनी सहभाग नोंदवित कार्यक्रमाच्या आयोजन समितीचे सर्व सदस्य व पदाधिकाऱ्यांना भगवान परशुराम जन्मोत्सवाच्या पावन पर्वावर सर्वांनाच हार्दिक शुभेच्छा दिल्यात.

## अयानला आता २७ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी

### अडचणीत वाढ : अचलपूर न्यायालयाला आले होते छावणीचे स्वरूप

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अमरावती :** अख्ख्या राज्याला हादरवून सोडणाऱ्या परतवाडा येथील तरुणींचे लैंगिक शोषण आणि न्यूड व्हिडीओ व्हायरल प्रकरणात मुख्य आरोपी अयान अहमद (१९, रा. परतवाडा) याच्यासह त्याच्या साथीदारांच्या अडचणीत वाढ झाली आहे. अचलपूर जिल्हा सत्र न्यायालयाने तपासाची गंभीर दखल घेत या प्रकरणातील चारही आरोपींना पुन्हा २७ एप्रिलपर्यंत वाढीव पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिसांच्या आक्रमक युक्तिवादासमोर आरोपींच्या वकिलांचा बचाव फिका पडला असून, आता या टोळीचे 'बँक बॅलन्स' आणि 'काळे कारनामे' उघड होणार आहेत. दरम्यान, मंगळवारी दुपारी अचलपूर न्यायालयासमोर अनेक नागरिकांनी निदर्शने करत आरोपींच्या फाशीची मागणी केली. त्यामुळे न्यायालय परिसराला पोलिस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले होते.

**मोबाइल डेटा रिकव्हरी करण्याचे काम युद्ध पातळीवर**

आरोपींच्या मोबाइलमधून आतापर्यंत ८ पीडितांचे १८ व्हिडीओ आणि ३९ फोटो समोर आले आहेत.
फॉरेन्सिकच्या मदतीने डिलीट केलेला डेटा रिकव्हर करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. अयानने व्हिडीओ बनवले, उजेरखानने ते चोरले आणि मोहम्मद साद व तबरेज खान यांनी ते व्हायरल केले, असा हा साखळी गुन्हा आहे. आरोपींच्या समक्ष हा डेटा पडताळून पाहण्यासाठी पोलिसांना न्यायालयाने सात दिवसांची वाढीव मुदत दिली आहे.

**आरोपींना फाशीच द्या**

आरोपी अयान अहमद याने अनेक मुलींना प्रेमजाळयात अडकविले. अनेकींचे शोषण केले. ब्लॅकमेलिंगसाठी व्हिडीओ रेकॉर्डिंग केली. त्यामुळे अयानसह त्याच्या टोळीला फाशी देण्यात यावी, हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा, अशी मागणी अनेक सामाजिक संघटनांनी केली. २०० पेक्षा अधिक नागरिकांनी घोषणाबाजी केली. त्यामुळे न्यायालयाच्या आत-बाहेर अतिरिक्त पोलिस कुमक तैनात करण्यात आली होती.

इन्स्टाग्राम रीलमध्ये दिसणारी पिस्टल कायदेशीर आहे की बेकायदा? अयानच्या रीलमध्ये दिसलेले आलिशान वाहन, महागडे मोबाइल, वाहनात दिसत असलेली रक्कम आणि फिरण्यासाठी लागणारा वारेमाप पैसा त्याच्याकडे आला कुठून? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी पोलिस कोठडीची गरज असल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच, आरोपींच्या बँक ट्रान्झ्रॉक्शनची तपासणी करून यामागे काही मोठे रॅकेट आहे का, याचाही छडा लावला जाणार आहे. न्यायालयाने ती विनंती मान्य करून चारही आरोपींना पुन्हा सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. आपल्याला आरोपींकडून ते वाहन, पिस्टल, आयफोन जप्त करायचे आहेत, असे पोलिसांनी न्यायालयाला सांगितले.

**आरोपींच्या वकिलांचा दावा फोल**

सात दिवसांत पोलिसांनी काय केले? ठोस पुरावे नाहीत, असा दावा करत आरोपींच्या वकिलांनी पोलिस कोठडीला विरोध केला. मात्र, प्रकरणाचे गांभीर्य आणि पीडित तरुणींच्या सन्मानाचा विचार करता न्यायालयाने पोलिसांच्या मागणीवर शिक्कामोर्तब केले. अमरावती ग्रामीण पोलिस व एसआयटीने आता या प्रकरणातील प्रत्येक पुरावा गोळा करण्यासाठी कंबर कसली आहे. २७ एप्रिलपर्यंत होणाऱ्या या चौकशीत अयान टोळीचे अजून किती बुरखे फाटतात आणि कुठली नवी नावे यात समोर येतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## मनपा शाळेत नव प्रवेशित विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अमरावती :** महानगरपालिका शाळांमध्ये विद्यार्थी संख्या वाढावी याकरिता शिक्षक सतत प्रयत्नशील असून महानगरपालिका उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा क्रमांक १४ वडाळी येथे इयत्ता पहिली मध्ये नवप्रवेशित विद्यार्थ्यांना नुकतेच शिक्षकांच्या सहकार्यातून स्कूल बॅग चे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांना शाळेबद्दल आकर्षण व्हावे तसेच नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा व पालकांचा उत्साह वाढावा याकरिता शिक्षकांनी स्वखर्चाने विद्यार्थ्याकरिता स्कूल बॅग खरेदी करून ज्या विद्यार्थ्यांनी इयत्ता पहिली मध्ये प्रवेश घेतला आहे अशा नव प्रवेशित मुलांना स्कूल बॅग चे वाटप मुख्याध्यापक श्री योगेश पखाले व शिक्षक वृंदांच्या हस्ते करण्यात आले.



अमरावती महानगरपालिका शाळेमधील शिक्षक पटनोंदणी सर्वेक्षण घरोघरी जाऊन करीत असून परिसरातील ङकोणताही विद्यार्थी शाळाबाह्य राहू नये प्रत्येक विद्यार्थी या शाळेत प्रवेशित व्हावा याकरिता प्रयत्नङ सुरू असून अमरावती महानगरपालिका उच्च प्राथमिक शाळा क्रमांक १४ वडाळी च्या मुख्याध्यापक व स्टाफ मिळून परिसरात सर्वेक्षण करत असून पात्र याकरिता शाळेतील शिक्षिका कुमारी नीलिमा लव्हाळे ,वैशाली देशमुख ,मनीषा वाकोडे, सुलोचना डाखोळे ,ज्योत्स्ना गवई,स्मिता वानखडे ,चेतना बोंडे, ज्योती सातपुते ,अनिता विधाते ,मोनिका पंधरे, निशा चव्हाण,अनुप भारंबे हे प्रयत्नशील आहेत.

## दिलीपबाबू इंगोले यांचे शिवपरिवाराच्या वतीने अभिष्टचिंतन

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अमरावती:** श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांच्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला शिवपरिवाराच्या वतीने अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ यांच्या प्रमुख उपस्थितीत मान्यवरांनी त्यांच्या निवासस्थानी गुलाबपुष्पहार देऊन शुभेच्छा दिल्या.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या प्रत्येक कार्याची खडानखडा माहिती ठेऊन प्रत्येक कार्यपूर्तीसाठी सातत्याने धडपडत राहणारे संस्थेचे



कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांचा संपूर्ण विदर्भात मोठा चाहता वर्ग आहे. विशेषत: भाऊसाहेबांच्या विचारांवर कार्य करणाऱ्या शिवपरिवाराच्या वतीने आज हेमंत काळमेघ यांच्या प्रमुख उपस्थितीत दिलीपबाबू इंगोले यांच्या निवासस्थानी जाऊन गुलाबपुष्पहार देऊन त्यांचे सहपरिवार अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी दिलीपबाबु इंगोले यांच्यासह त्यांच्या पत्नी सौ.प्रेरणाताई इंगोले, चिरंजीव अक्षय इंगोले यांचीही उपस्थिती होती.

यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष नरेश पाटील, बँकेचे संचालक तथा भारत कृषक समाजाचे जिल्हाध्यक्ष भैय्यासाहेब मेटकर, संचालक सुरेंद्र गावंडे, संचालक ओंकार बंड तसेच राजू सुंदरकर, ?ड.मनोज खंडारे, संजय भोकसे, आशिष इखे, नितीन कडू, राजेश गाडगे, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस प्रफुल्ल घवळे,नरेंद्र इंगोले, प्रतिक खुरद,युवक बिरादरीचे माजी संचालक गौरव इंगळे, अनिल कराळे, चंदू अढाऊ यांच्यासह अन्य मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थीती होती. यावेळी इंगोले परिवारातील सर्व सदस्यांची देखील उपस्थिती होती.

## पी .आर पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात पदवी प्रदान समारंभ

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अमरावती :** पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय अमरावती येथे नुकताच सर्व शाखेतील बी. ई. अंतिम वर्ष २०२५ तसेच एमबीए व एमसीए पहिली ऑटोनॉमस बॅचचा पदवी प्रदान समारंभ उत्साहात संपन्न झाला या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयातील सर्व शाखेतील बी.ई अंतिम वर्ष २०२५ च्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न असलेल्या व एमबीए एमसीए ऑटोनॉमस बॅच विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली . याच सोबत विद्यापीठातील गुणवत्ता यादीतील प्राविण्य सुचित नाव असलेल्या एकूण २५ विद्यार्थ्यांचा

### महाविद्यालयातील २५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत



सत्कार डॉ. नितीन कोळी (संचालक परीक्षा नियंत्रक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ) यांच्या हस्ते करण्यात आला. यावर्षी पी. आर पोटे अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या अभियांत्रिकी , एम.सी.ए व एम.बी.ए च्या एकूण २५ विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या गुणवत्ता धारक प्राविण्य सूचित स्थान प्राप्त केले .

कार्यक्रमांची सुरवात सरस्वती व संत गाडगे महाराज प्रतिमेचे पूजन, महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीताने झाली. यानंतर डॉ. नितीन कोळी (संचालक परीक्षा नियंत्रक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ) यांनी विद्यार्थ्यांना भारतासारख्या प्रगतिशील राष्ट्रात भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि देशांतर्गत ऊर्जा निर्मितीचे महत्त्व विशद केले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.एम जावंधिया यांनी पदवी प्राप्त विद्यार्थी यांना नैतिकतेची शपथ दिली व विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच संस्थेचे संचालक डॉ. पी.एम खोडके यांनी गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. पदवीप्रदान कार्यक्रमाला संस्थेचे संचालक डॉ पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी.एम. जावंदीया, उपप्राचार्य डॉ मो. झुहेर सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. गौरी देशपांडे यांनी केले. तर डॉ सचिन सराफ, डॉ सोमदत्त तोंडरे यांनी कार्यक्रमचे उत्कृष्ट आयोजन केले. सर्वात शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## जिल्हा सामान्य रुग्णालयात 'जागतिक हिमोफिलिया दिन' साजरा

### २८ रुग्णांची मोफत 'इन्हीबिटर' चाचणी, तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अमरावती:** रक्ताशी संबंधित असलेल्या हिमोफिलिया आजाराविषयी समाजामध्ये जनजागृती व्हावी आणि या आजाराचे वेळेत निदान व्हावे, यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयातर्फे 'हिमॅटोलॉजी डे केअर सेंटर' येथे जागतिक हिमोफिलिया दिन साजरा करण्यात आला. यात जिल्ह्यातील २८ रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपस्थित होते. हिमोफिलियाच्या रुग्णांना रक्तातील संबंधित 'फॅक्टर' द्यावे लागतात. मात्र, ५ ते १० टक्के रुग्णांमध्ये ठराविक काळानंतर या फॅक्टरचा परिणाम दिसून येत नाही.




त्यांच्या शरीरात फॅक्टरच्या विरोधात 'इन्हीबिटर' तयार होतात. ही बाब लक्षात घेऊन, जागतिक हिमोफिलिया दिनाचे औचित्य साधून शिबिरातील २८ रुग्णांची मोफत 'इन्हीबिटर' चाचणी करण्यात आली. शिबिरात तज्ज्ञांनी रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना आजाराची सखोल माहिती दिली. हिमोफिलियासोबत आयुष्य सुरक्षितपणे करून जगावे, वेदना कशाप्रकारे कमी कराव्यात आणि नियमित उपचार कसे घ्यावेत, यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. हे शिबिर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप हेडाऊ, डॉ. सोळंके आणि अधिसेविका श्रीमती अटाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

## कौशल्य विकास विभागातर्फे निबंध स्पर्धा

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अमरावती:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे राज्यभरात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये विचारप्रवर्तक लेखनाची आवड निर्माण करणे तसेच डॉ. आंबेडकर यांच्या विचाराचा प्रसार करणे, हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले. डॉ. बाबासाहेब आबेडकर यांनी महिलांविषयी केलेले कार्य, महिला साक्षमीकरणात त्यांनी दिलेले योगदान या विषयावर निबंध स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत पहिल्या गटात शासकीय आयटीआय, खासगी आयटीआय, तसेच आयटीआय उत्तीर्ण झालेले विद्यार्थी यात सहभागी होऊ शकतील. निबंधाच्या विषयासाठी विद्यार्थ्यांना ५०० ते ८०० शब्दांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. दुसरा खुला गट असून यात राज्यातील सर्व महिला आणि पुरुष सहभागी होऊ शकतील. या गटाला ८०० ते १ हजार २०० शब्दांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. दोन्ही गटाला निबंध केवळ मराठी भाषेत सादर करावा लागणार आहे. स्पर्धेचा कालावधी दि. १४ एप्रिल ते दि. २५ एप्रिल २०२६ हा निश्चित करण्यात आला आहे.

## मधपाळांसाठी 'मधुमित्र' व 'मधुसखी' पुरस्कार

### ४ मेपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने २० मे रोजी जागतिक मधमाशी दिनाचे औचित्य साधून, राज्यातील यशस्वी मध उद्योजकांना 'मधुमित्र' व 'मधुसखी' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक उमेदवारांनी नामांकन अर्ज ४ मे पूर्वी मंडळाच्या जिल्हा कार्यालयात सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

मधमाशीपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी आणि मधपाळांना प्रोत्साहन देण्यासाठी मंडळाने गेल्या तीन वर्षांपासून हा उपक्रम सुरू केला आहे. मधमाशीपालन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मधपाळांना प्रथम पुरस्कार ११ हजार रुपये, द्वितीय पुरस्कार ७ हजार रुपये, तृतीय पुरस्कार ५ हजार रुपये पुरस्कार देण्यात येणार आहे. यातील एक पुरस्कार महिला मधपाळासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. या पुरस्कारांचे वितरण २० मे २०२६ रोजी पुणे येथील समारंभात केले जाणार आहे.

अर्ज करण्यासाठी नामांकन अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.msib.org उपलब्ध आहेत. तसेच, जिल्ह्यातील खादी मंडळाच्या जिल्हा कार्यालयातूनही अर्ज प्राप्त करता येतील. या पुरस्काराबाबत अधिक माहितीसाठी इच्छुकांनी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, अमरावती ०७२१-२६६२७६२, ९४२०७७१५३५ किंवा संचालक, मध संचालनालय, महाबळेश्वर यांच्याशी ०२१६८-२६०२६४ संपर्क साधावा.

मधमाशीपालन क्षेत्रात कार्यरत असलेल्या मधपाळांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदिप चेचरे यांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि २२ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## महावितरणच्या गलथान कारभाराविरोधात डहीकर आक्रमक

**मालेगाव :** महावितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे डही वारंगी ईरळा गोकसावगी येथील नागरिक गेल्या आठ दिवसांपासून अंधारात जीवन जगत असून तीव्र उष्णतेच्या लाटेत नागरिकांचे हाल होत आहेत महावितरणकडून ग्राहकांची आर्थिक व मानसिक लूट सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.गेल्या आठ दिवसांपासून डही येथे वीजपुरवठा खंडित असल्याने संतप्त नागरिक मोठ्या संख्येने मालेगाव येथील महावितरण कार्यालयात दाखल झाले मात्र कार्यालयात एकही जबाबदार अधिकारी उपस्थित नसल्याने नागरिकांचा रोष अनावर झाला यावेळी संतप्त ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून निषेध नोंदविला यावेळी गजानन बोरचाटे यांनी इशारा देताना सांगितले की जर दोन तासांत वीजपुरवठा सुरू झाला नाही तर शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.या आंदोलनात भगवान बोरकर विजय शेंडगे प्रशांत ठाकरे राजु पाटील दहात्रे वसंतराव आंधळे संतोष बोरचाटे कैलास बोरचाटे श्रीकृष्ण बोरचाटे वैभव बोरचाटे आदिनाथ बोरचाटे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# एसटीत प्रवाशांना सवलत, कशी वाढणार दौलत !

## वाहकांना प्रवाशी वाढवा, उत्पन्न वाढवाचे टार्गेट, एसटीतून फक्त सवलती धारकच प्रवास करतात थेट

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

अगोदरच घाट्यात असलेल्या परिवहन महामंडळाला कोरोना पासून राज्य परिवहन महामंडळाला लागलेल्या घरघरीतून काही केल्या उभारी मिळत नाही. कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी संप पुकारला होता. त्यातच राज्य सरकारने विविध सवलती जाहीर केल्याने त्याचा उत्पन्नावर मोठा परिणाम होत आहे. तिकीट दरात वाढ करूनही सवलती धारकच एसटीमधून प्रवास करतांना दिसत आहे . महाराष्ट्राच्या महिलांना ५० टक्के आरक्षण दिले. या अगोदर ७५ वर्षीय ज्येष्ठांना मोफत तर ६५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत सुरु आहे. या शिवाय विद्यार्थ्यांनाही सवलतीच्या दरात पास देण्यात येते.



गाव खेड्यात परिवहनाच्या दृष्टीने महत्वाची मानली जाणारी सर्वांची आवडती लालपरी (एसटी) सध्या अडचणीत आहे. पुन्हा एकदा कर्मचाऱ्यांचे पगार थकले होते. आता राज्य सरकारने रक्कम देऊ केल्याने पगार होणार आहेत. मात्र परिवहन महामंडळाच्या मागे लागलेले उत्पन्न घटीचे शुक्लकाष्ठ काही केल्या संपत नाहीये. राज्य परिवहन महामंडळा कडून गेल्या काही दिवसांपासून उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न केले जात असून चालक-वाहकांना प्रवासी वाढीचे उद्दिष्ट्य देण्यात आले आहे. मात्र दुसरीकडे राज्य सरकारने सुरू केलेल्या विविध सवलत योजना त्यात आडकाठी ठरत आहेत.ज्यात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्ताने सुरू केलेली ७५ वर्षा वरील जेष्ठ नागरिकांसाठीची मोफत प्रवास योजना, ६५ ते ७५ वर्षापर्यंतच्या नागरिकांसाठी ५० टक्के सवलत योजना व विद्यार्थ्यांसाठीच्या विविध योजना यामुळे सवलत धारक प्रवाश्यांचीच मोठी संख्या आहे. तर आता महिलांना अर्थसंकल्पात ५०ℨ सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे उत्पन्न वाढणार तरी कसे असा प्रश्न उपस्थित होत आहे. मागील वर्षी झालेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रदीर्घ आंदोलना नंतर राज्य परिवहन महामंडळाने उत्पन्न वाढवून स्वयंपूर्ण व्हावे असा सल्ला राज्य सरकार व समस्या सोडविण्या साठी नेमलेल्या समितीने दिला होता. मात्र काही केल्या एसटीला आपले पूर्वीचे वलय गाठता येत नाहीये.

त्यामुळे पुन्हा कर्मचाऱ्यांच्या पगाराचा प्रश्न उपस्थित झाला होता. लोकांचा खाजगी वाहतुकीकडे वाढलेला कल, बसेसची झालेली दुरवस्था, अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार अन. राज्यकर्त्यांची फक्त लुटीची भूमिका यामुळे एसटीच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

### यांना आहेत सवलती...

७५ वर्षीवरील ज्येष्ठ नागरिक ,आमदार, खासदार, पत्रकार ,दलीत मित्र, यांना मोफत प्रवास आहे. तर ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक व महिलांना ५० टक्के सवलत तर शालेय विद्यार्थ्यांना पासमध्ये सवलत देण्यात येते.







## थोडक्यात

### आदिवासी आश्रम शाळेत सॅनिटरी पॅडचे वाटप

**विद्यार्थिनींना दिले बँकिंग सुरक्षेचे धडे. एसबीआय रिसोड शाखेचा स्तुत्य उपक्रम.**




● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

भारतीय स्टेट बँक (SBI) शाखा रिसोडच्या वतीने सामाजिक उत्तरदायित्व फंडातून एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. कंकरवाडी येथील पार्वतीबाई नागरे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅड्सचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून मुलींचे आरोग्य आणि आर्थिक साक्षरता या दोन्ही विषयांवर प्रकाश टाकण्यात आला.

बँकिंग सुरक्षिततेचे महत्त्व पटवून दिले: यावेळी बँकेचे शाखा प्रबंधक सत्यनारायण प्रसाद यांनी उपस्थित विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. 'बँकेत खाते असणे ही काळाची गरज आहे,' असे सांगत त्यांनी भारतीय स्टेट बँक ही देशातील सर्वात मोठी आणि सुरक्षित बँक कशी आहे, याचे महत्त्व पटवून दिले. 'आपले पैसे सुरक्षित ठेवण्यासाठी आणि भविष्यातील गरजांसाठी बँकेत खाते असणे आवश्यक असून, एसबीआयमध्ये तुमचे भविष्य सुरक्षित आहे,' असे त्यांनी आवर्जून सांगितले.या कार्यक्रमाला अनंत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदासराव कुंडलिकराव नागरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शाळेचे प्राचार्य राधाकिसन नामदेव जुंजारे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एम. ए. मुंडढे, अनिल थोरात, दत्ता मोरे, सुधाकर कोल्हे, भाऊसाहेब जाधव, प्रदीप सदार, आत्माराम निळे, ओमकार हटवार, शेषराव घनदारे या शिक्षकांसह शिक्षिका कुमारी के.डी. सावरकर, कुमारी व्हि.के. ठोसर पवन खडसे, युवराज धोंडगे,व इतर सर्व कर्मचारी वृंदाने परिश्रम घेतले.

## मोठ्या गावात अतिरिक्त रेशन दुकान का नाही 'वाटे'...

# पुरवठा विभागाचे डिलर सोबत 'साटे-लोटे'!

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

**महाराष्ट्र शासनाने मोठ्या लोकसंख्या असलेल्या गावात रेशन कार्ड ची संख्या लक्षात घेता त्या गावात एकापेक्षा दुसरे दुकान उघडण्याची परवानगी निर्देश तालुका जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना दिलेले आहेत परंतु जुन्या रेशन दुकानाचे आर्थिक साठे लोटे जिल्हा तालुका पुरवठा अधिकाऱ्यांशी असल्यामुळे अनेक गावातील ऑडिओ लोकसंख्या व रेशन करण्याची संचा लक्षात घेता इथे अतिरिक्त दुकाने अद्याप दिलेली नाहीत याला सर्वस्वी जबाबदार व तालुका पुरवठा अधिकारी असून यांनी आतापर्यंत हलगर्जीपणाच्या नावाखाली वेळ काढून आकल्याने याचा फायदा संबंधित मोठ्या गावातील कंट्रोल डीलर धारकांना होत आहे.**



निर्णय त्यांच्या विरोधात जाऊ नये म्हणून व एकापेक्षा दुसरे दुकान गावात होऊ नये म्हणून आर्थिक रसात पुरून तालुका व जिल्ह्यातील पुरवठा अधिकाऱ्यांना हाताशी ६ एकापेक्षा दुसरे दुकान देण्याचा अहवाल शासनाकडे गेल्या अनेक वर्षांपासून गेलेला नाही. जिल्ह्यातील तालुक्यातील सर्व रेकॉर्ड तेथील लोकसंख्या व रेशन कार्ड ची संख्या तालुका पुरवठा अधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना माहीत असताना निवांत बसणारा गावात एकापेक्षा दुसरे दुकान देण्याची शिफारस शासनाकडे का केल्या गेली नाही? याची सुद्धा चौकशी होणे गरजेचे आहे. अजून यांना काही प्रश्न विचारले ची उत्तरा सर्व उडवा ओळीची देतात. सदर वाडीव दुकानाचे अहवाल शासनाकडे पाठवण्याची जबाबदारी तालुका पुरवठा अधिकारी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यावर असताना कशातून दोनच वेळा हे अहवाल पाठवण्याची संधी वा जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांच्या असताना अद्याप तसे का घडले नाही याची सुद्धा चौकशी करणे अपेक्षित आहे. मातब्बर असलेले जुने जाणते रेशन दुकानदार यांना अधिकाऱ्यांच्या सर्व आर्थिक नाऱ्या माहीत असल्याकारणाने आर्थिक रसात पुरून आपल्या दुकानावर कोणताही परिणाम होऊ नये म्हणून या अधिकाऱ्यांना आर्थिक पुरवठा करून सदर अहवाल अद्याप या जिल्ह्यातून गेले का गेले नाहीत याचे सुद्धा चौकशी होणे अपेक्षित आहे.

संबंधित अधिकारी रो सामान्याच्या जीवाशी का खेळतात याचा अध्यापन उत्तर प्रशासना लावा नागरिकांना मिळालेला नाही. यात मोठे होत असलेले रेशन घोटाळे आणि प्रचंड प्रमाणात बाहेर वाहतूक होत असलेला गहू व तांदूळ पकडून दिल्यानंतर हे नक्की हा मङङ कोणाचा आहे व कोणाच्या मार्गदर्शनाखाली बाहेर जात आहे याचा अध्यापन उत्तर पुरवठा विभागाला मिळालेला नसल्याचे दिसते याच्या मागील एकमेव कारण आहे ते अर्थ कारण राज्यातील सर्व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या व तालुका पूर्ण अधिकाऱ्यांच्यीं च्या माध्यमातून चौकशी जर लावल्या हे प्रकरण सुद्धा ईडी शिवाय कडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही कारण या प्रकरणात अमाप पैसा कमवण्याचे समोर येते. तसेही भ्रष्टाचाराच्या प्रकरणात महसूल विभाग अव्वल असल्याचे लाचलुसवत प्रतिबंधात्मक विभागाच्या माध्यमातून होत असलेल्या कारवाई व त्यातून अव्वल असलेले विभाग त्यामध्ये पुरवठा विभागाचा सुद्धा प्रथम क्रमांक त्याच्या लक्षात ये म्हणून संबंधित अधिकाऱ्यांना विनंती की शासनाचा पगार घेऊन शासनाच्या निर्णयाविरोधात केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी व डिलांच्या भल्यासाठी शासनाच्या आणि जनतेची बेमानी करणाऱ्यांना यांच्या चौकशी एसीबीच्या माध्यमातून कोणी आवश्यक आहे.

## तहसीलचे कर्मचारी बेमुदत संपावर

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या साठी मालेगाव तहसील कार्यालयातील सर्व कर्मचारी ता. २१ एप्रिल पासून बेमुदत संपावर गेल्याने तालुक्यातील जनतेची फार मोठी कामाची गैरसोय होऊन कामं प्रभावीत झाली आहे.तेव्हा शासनाने तातडीने निर्णय घ्यावा व संप मिटवण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी लोकांतून केली जात आहे.

येथील तहसील कार्यालयातील कर्मचारी हे सकाळी ता. २१ पासून बेमुदत संपावर गेले आहेत.सकाळी सर्व कर्मचारी यांनी तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करत बेमुदत संप पुकारत असल्याचे सांगितले आहे. बाजारचा दिवस असल्याने अनेक लोक तहसील मध्ये आवश्यक कागदपत्रे काढण्यासाठी आले होते.परंतु कार्यालयात एकही कर्मचारी उपस्थित नसल्याने त्यांना खाली हात परतावे लागले.

## शाश्वत नैसर्गिक शेतीची कास धरावी - आ.खोडे

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●





वाशिम तालुक्याची खरीप हंगाम पूर्व नियोजन बैठक आमदार श्याम भाऊ खोडे, विधानसभा सदस्य वाशिम मंगरूळपीर विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी तहसील कार्यालय वाशिम सभागृहात पार पडली, सदर बैठकीस उपविभागीय अधिकारी, वाशिम वैशाली देवकर, उपविभागीय कृषी अधिकारी वाशिम संतोष वाळके, तालुका कृषी अधिकारी वाशिम अतुल जावळे, तालुका अध्यक्ष भाजपा एकनाथ कड , सुभाष चौधरी, सुभाष नानोटे, रामाभाऊ इंगळे, प्रल्हाद गोरे, शरद चव्हाण, बाळू पाटील, डॉ.प्रमोद गंगावणे, जगदीश देशमुख, राजू इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीमध्ये आमदार खोडे यांनी खरीप हंगाम पूर्व नियोजनाचा आढावा घेतला जनजागृती मोहिमेबाबत या ठिकाणी सावरगाव जिरे येथील सुनील कोल्हे, खरोळा येथील दीपक वारकड, सुपखेला येथील केशव राऊत या नैसर्गिक व सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा तसेच पीक स्पर्धेतील विजेते शेतकरी जयपूर येथील राजू सुधाकर बल्लाळ, गजानन कडूजी बल्लाळ तसेच दूधखेडा येथील कुशांत धोटे यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी, रोहिणी उगले, तालुक्यातील उप कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी तसेच बहुसंख्येने शेतकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळ कृषी अधिकारी शिवाजी जाधव यांनी केले तर मंडळ कृषी अधिकारी विठ्ठल गोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# नायब तहसीलदाराचे शिबिरातून नव्हे तर वसुलीतून 'समाधान' !

## नायब तहसीलदार कुळमेथेचे टिप्पर कारवाईत 'मलिद्यातून' समाधान – 'मलिद्यात सर्वांचाच हात' मग कारवाईचा कसा होईल घात



● प्रभाकर नाईकवाडे @ रिसोड ●

रिसोड तालुक्यातील केनवड येथे आयोजित करण्यात आलेल्या समाधान शिबिरात अनेक नागरिक विविध कामांसाठी उपस्थित होते. मात्र काही ठिकाणी कर्मचारी अपुरे असल्याने आणि कामाचा वेग कमी असल्याने अनेकांना दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागली. काही नागरिकांची कामे प्रलंबितच राहिल्याची तक्रार करण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान नायब तहसीलदार कुळमेथे यांनी शिबिराला भेट देऊन उपस्थिती दर्शवली. त्यानंतर तेथून निघून गेल्याची माहिती नागरिकांनी दिली. शिबिर सुरू असताना जबावदार अधिकारी उपलब्ध नसल्याने काही कामे तत्काळ निकाली निघू शकली नाहीत.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, त्यानंतर संबंधित अधिकारी मेहकर–मालेगाव महामार्गावर वाळू वाहतुकीवरील कारवाईसाठी गेले आणि काही काळ तेथे थांबले. त्यामुळे शिबिरातील कामे प्रलंबित असताना इतर कारवायांना प्राधान्य का दिले जात आहे, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या घटनेनंतर नागरिकांमध्ये विविध चर्चा सुरू असून, शिबिरातून अपेक्षित समाधान न मिळाल्याने नाराजी वाढली आहे. काही जण 'मलिदा' या मुद्द्यावरही प्रश्न उपस्थित करत असून, या सर्व प्रकाराची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि शिबिरातील त्रुटी दूर करून प्रलंबित कामे निकाली काढावीत, अशी मागणी करण्यात येत आहे.

### बावनकुळे साहेब, चिखलीसारखी कार्यवाही केनवड प्रकरणात करा हो – शेतकऱ्यांचा आर्त टाहो

रिसोड तहसील अंतर्गत केनवड येथे आयोजित करण्यात आलेल्या समाधान शिबिराबाबत ग्रामस्थांकडून नाराजी व्यक्त होत आहे. शिबिर सुरू असताना नायब तहसीलदार कुळमेथे यांनी कामानिमित्त तेथून निघून गेल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली. त्यामुळे शिबिरातील काही कामे प्रलंबित राहिल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, त्यानंतर संबंधित अधिकारी मेहकर–मालेगाव महामार्गावर वाळू वाहतुकीवरील कारवाईत व्यस्त होते. त्यामुळे शिबिरातील नागरिकांच्या समस्यांपेक्षा इतर कारवायांना प्राधान्य दिले जात असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.या पार्श्वभूमीवर काही नागरिकांनी कारवाई प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित केले असून, संपूर्ण प्रकाराची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, चिखली येथे कामातील दिरंगाईबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई केल्याच्या पार्श्वभूमीवर, 'केनवड प्रकरणातही अशीच कार्यवाही करावी,' असा शेतकरी व नागरिकांकडून आर्त टाहो व्यक्त होत आहे.




## आ. खोडे यांच्या उपस्थितीत पाणीटंचाईची सभा गाजली !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



येथील तहसील कार्यालयाच्या सभागृहामध्ये आ श्याम खोडे, वाशिम मंगरूळपीर विधानसभा यांचे अध्यक्षतेखाली वाशिम व मंगरूळपीर या तालुक्यातील पाणीटंचाई व मुख्यमंत्री बळीराजा पांधन रस्ता बाबत आढाव सभा नुकतीच पार पडली.

सदर सभेला रवी काळे, उपविभागीय अधिकारी, मंगरुळपीर, उपविभागीय पोलीस अधिकारी वाशिम मंगरूळपीर तहसीलदार वाशिम मंगरूळपीर गटविकास अधिकारी वाशिम -मंगरुळपीर दोन्ही तालुक्यातील ग्रामसेवक व सरपंच उपस्थित होते. तसेच मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्ते समितीवर नवनियुक्त सदस्य उपस्थित होते. सर्वप्रथम वाशिम तालुक्याचा व नंतर मंगरुळपीर तालुक्यातील पाणीटंचाई बाबत आढावा घेण्यात आला त्यामध्ये सद्यस्थितीत सुरू असलेल्या उपाययोजनाबाबत माहिती देण्यात आली व सभेला उपस्थित असलेल्या सर्व सरपंच व ग्रामसेवक यांचे कडून पाणी टंचाई बाबत आढावा घेण्यात आला. त्यानंतर मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्ता बाबत आढावा घेण्यात आला याकरिता समितीवर नवनियुक्त सदस्य ही उपस्थित होते त्यांनी आपापले मत मांडले व शासनाच्या उद्देशाप्रमाणे सर्व ग्रामीण भागातील पांदण रस्ते चे सविस्तर अंदाजपत्रक सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. वाशिम मंगरूळपीर विधानसभा आमदार शाम खोडे यांनी सभेमध्ये जनतेनी उन्हापासून संरक्षण करावे सोबतच वाशिम मंगरूळपीर मतदार संघामध्ये ज्या ज्या गावात पाणी टंचाईची समस्या आहे त्या ठिकाणी प्रशासनाने प्रामुख्याने लक्ष देऊन त्या समस्येचे निराकरण करावे अशा सूचना केल्या.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# खामगावात गॅस तुटवड्याने सर्वसामान्य वैतागले ; दुप्पट दराने सिलिंडर खरेदीची वेळ

प्रतिनिधी २२ एप्रिल

**खामगाव :** मध्य-पूर्व आशियातील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात घरगुती गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाला आहे. परिणामी, शहरात काळाबाजार वाढला असून, नागरिकांना गॅस सिलिंडरसाठी निर्धारित किमतीपेक्षा तब्बल ८०० ते ९०० रुपये अधिक मोजावे लागत आहे. सिलिंडरसाठी दुप्पट खर्च करावा लागत असल्याने सर्वसामान्य ग्राहक होरपळत असून, त्यांच्या घरगुती अर्थकारणावर मोठा ताण निर्माण झाला आहे.

'बुकिंग'ची अट, काळाबाजार आणि विलंबामुळे नागरिकांचे घरगुती अर्थकारण कोलमडलेः कारवाईची करण्याची मागणी



शासनाने शहरी भागासाठी २५ दिवसांनी, तर ग्रामीण भागासाठी ४५ दिवसांनीच गॅस बुकिंग करण्याची अट घातल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. बुकिंग केल्यानंतरही सिलिंडर मिळण्यासाठी पाच ते सहा दिवसांचा कालावधी लागत असल्याने नागरिकांना नाइलाजास्तव जादा दराने गॅस सिलिंडर खरेदी करावा लागत आहे. परिणामी, घरगुती नियोजन विस्कळीत होत असून, ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याप्रकरणी कारवाईची मागणी होत आहे.गॅसचा तुटवडा आणि कठोर अटींमुळे काळाबाजाराला खतपाणी मिळत असल्याचे दिसून येत आहे. काही विक्रेते संधीचा फायदा घेत जादा दर आकारत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत; मात्र पुरवठा विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याने ही समस्या अधिकच गंभीर बनत आहे.गॅस बुकिंग केल्यानंतरही सिलिंडर मिळण्यासाठी पाच ते सहा दिवसांचा विलंब होत आहे. या विलंबामुळे घरगुती नियोजन कोलमडत असून, ग्राहकांना पर्याय नसल्याने जादा खर्च सहन करावा लागत आहे.

### पुरवठा विभागाचे दुर्लक्ष ?

◆गॅस तुटवडा आणि काळाबाजाराच्या तक्रारी वाढत असतानाही संबंधित पुरवठा विभागाकडून प्रभावी नियंत्रण किंवा कारवाई होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. त्यामुळे परिस्थिती सुधारण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे.

# नारी शक्ती वंदन विधेयकास विरोध करणाऱ्या कॉग्रेस, इंडिया आघाडीचा शिवसेनेने केला निषेध

प्रतिनिधी २२ एप्रिल

**खामगाव :** लोकशाहीच्या मंदिरात...अर्थातच लोकसभा व राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३३ आरक्षण देणारा 'नारीशक्ती वंदन अधिनियम' दिनांक १६ एप्रिल २०२६ पासून लागू होणार होता.

कॉंग्रेस व विरोधकांनी या विधेयकाला विरोध केल्याबद्दल त्यांचा खामगाव तालुका शिवसेनाच्या वतीन केंद्रिय मंत्री शेवसेना नेता ना.प्रतापराव जाधव यांच्या आदेशाने तीव्र निषेध करण्यात आला. राजकारणामध्ये आरक्षण देण्याकरिता नारी शक्ती वंदन विंधेयक पंतप्रधान नरेंद्र मोदी व शिवसेनेच्या वतीने महाराष्ट्र राज्याच उपमुख्यमंत्री शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिदे यांचे नतृत्वात एन.डी.ए. सरकारने लोकशाहीमध्ये भारतातील महिलांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित करणारा हा कायदा लागू झाला असता तर १६ एप्रिल २०२६ ही तारीख व महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुढाकार एनडीए सरकारने घेतला होता व एनडीए सरकारचे नाव भारताच्या इतिहासात नेहमीच सुवर्णाक्षरांनी लिहिल्या गेले असते.

संपुर्ण भारतामध्ये महिलांना'मानाच स्थान'आहे. तसेच त्यांना विधेयकास व महिला सशक्तीकरणाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या विधेयकाला कॉग्रेस व इंडिया आघाडीने या विधेयकाला विरोध करुन महिलांबद्दल आपली विरोधी मानसिकता दाखविली आहे.या विधेयकाला विरोध करणाऱ्या कॉग्रेस व इंडिया आधाडीचा तिव्र शब्दात, घोषणेबाजी करत, निवेदन देत निषेध व्यक्त केला व येत्या काळात ईश्वर इंडिया आघाडीला सद्बुद्धी देऊन महिला विधेयक मंजुर होवो अशी सुद्धा प्रार्थना करण्यात आली यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख संजय अवताडे, शिवसेना युवानेते अमोल अंधारे, शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बघे, शिवसेना विधानसभा संपर्क प्रमुख सुरेश वावगे, शिवसेना शहर प्रमुख चेतन ठोंबरे, शिवसेना महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख कावेरी वाघमारे, महिला आघाडी तालुकाप्रमुख सौ जयश्री देशमुख, युवा सेना तालुकाप्रमुख अमोल फेरंग, युवासेना तालुकाप्रमुख बहादूर वाघे, महिला आघाडी शहर प्रमुख श्रुती पतंगे, युवासेना शहर प्रमुख श्री राहुल पुंजाजी कळमकार, पिंटू धोरण, विद्यार्थीसेना जिल्हाप्रमुख विकी सारवाण, पियु चव्हाण शिवसेना वैद्यकीय जिल्हा संघटक, करण छापरवाल, अभिषेक तिवारी, अजय अशोक अंबुसकर, सौ श्वेता पाटील, रमेश अवचार ,श्याम गायकवाड, निलेश भवरे, डॉ.अभिजीत महानगर संजय घाडगे, जीवन जाधव, रवी माळवंदे, दिनेश पतंगे, अंकित पुरवार, पवन लांडे, पंकज अंबारे, आशिष लांडगे, भूषण दुतोंडे, राजेंद्र बोराडे, आदींसह शिवसेना पदाधिकारी कार्यकर्ते शिवसैनिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

१६ एप्रिल २०२६ : नारीशक्तीच्या सन्मानाचा ऐतिहासिक दिवस विरोधकांनी काळा दिवस केला !




# किरकोळ वादातून मारहाण; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

◆ जनुना येथील बसथांबा परिसरातील घटना

प्रतिनिधी २२ एप्रिल

**खामगाव :** तालुक्यातील जनुना येथे बसथांबा परिसरात किरकोळ वादातून झालेल्या मारहाणीप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी संतोष नथ्थू पाडसकार (३८) यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी आकाश संतोष पवार (३०) याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. ही घटना २० एप्रिल रोजी पहाटे ५ वाजताच्या सुमारास जनुना येथील बसस्थानकात घडली. फिर्यादी हे मित्रासोबत बोलत असताना आरोपी तेथे आला. संभाषणाबाबत गैरसमज झाल्याने आरोपीने शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर प्लास्टिकच्या पाइपचा तुकडा उचलून फिर्यादीला मारहाण केली. या घटनेत फिर्यादीच्या छातीवर व्रण उमटला असून डाव्या हाताच्या मनगटावर किरकोळ जखम झाल्याचे तक्रारीत म्हटले.घटनेवेळी नितीन रामदास कोळसे यांनी मध्यस्थी करून वाद मिटविण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ३५२, ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# अधिकारी कार्यालयात, कर्मचारी संपावर ; कामकाज ठप्प !

◆ शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप सुरू

प्रतिनिधी २२ एप्रिल

**खामगाव :** विविध प्रलंबित मागण्यांसाठी शासकीय व निमशासकीय कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने २१ एप्रिलपासून बेमुदत संप पुकारण्यात आला आहे. या संपात खामगाव येथील महसूल विभागासह इतर विभागांतील कर्मचारी सहभागी झाले असून, शासकीय कार्यालयांतील कामकाज मोठ्या प्रमाणात ठप्प झाले आहे. तरी कर्मचारी संपावर असल्यामुळे अधिकारी कार्यालयात उपस्थित असले दैनंदिन कामकाजात गंभीर अडथळे निर्माण झाले आहेत.

या आंदोलनात सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची सविस्तर अधिसूचना तत्काळ जारी करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. तसेच शासकीय, निमशासकीय कर्मचारी आणि शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवासंबंधित प्रश्नांवर मुख्यमंत्री स्तरावर चर्चा होऊन ठोस निर्णय घ्यावा, यासह विविध मागण्या करण्यात आल्या असून आंदोलन हाती घेण्यात आले आहे.विधानसभेच्या पटलावर मान्य झालेल्या मागण्यांकडेही शासनाने दुर्लक्ष केल्याने कर्मचारी व शिक्षक वर्गात नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे अखेर बेमुदत संपाचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती तहसील कार्यालयातील कर्मचारी प्रविण पवार यांनी दिली. या संपात पी. एस. टेकाळे, अरूण कस्तुरे, सरोज पवार, नंदकिशोर चौधरी, व्ही.एम. पवार, जे.एम. वाघ, वैशाली जंजाळ, जे. एस. बटवे, आर.पी. खंडारे, जे.एस. वानरे, राजू देशमुख, डी.एस. तायडे आदी महसूल कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

### अशा आहेत काही मागण्या

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी विना अनुदान किंवा अंशतः अनुदानावर नियुक्त, तसेच २००५ नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. याशिवाय, चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंदी तत्काळ उठवावी, १०, २० व ३० वर्षांच्या सेवेनुसार आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू करावा, तसेच कंत्राटी व रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या सेवांचे नियमितीकरण करावे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. तसेच, सर्व शासकीय कर्मचारी व निवृत्तीवेतनधारकांना महत्त्वाच्या रुग्णालयांमध्ये कॅशलेस उपचार सुविधा मिळावी, अशा मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू आहे.

# मेहकर शहरवासियांना ११ दिवसांनी होणारा पाणीपुरवठा जलवाहिनी फुटल्याने ठप्प!

प्रतिनिधी २२ एप्रिल

**मेहकर :** शहराच्या पाणीपुरवठ्याचा कणा असलेली मुख्य जलवाहिनी उसरण गावाजवळ फुटल्याने मेहकरकरांवर अक्षरशः पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे. आधीच अकरा दिवसांनी नळाला पाणी येत असताना या मोठ्या शहराचा बिघाडामुळे पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला असून नागरिकांचा संताप उफाळून आला आहे. शहराला सुमारे बारा किलोमीटर अंतरावरील कोराडी प्रकल्पावरून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, उसरण येथील मनीष शेळके यांच्या शेतातून जाणाऱ्या कालव्याच्या दुरुस्ती व खोलीकरणाच्या कामादरम्यान जलवाहिनी फुटल्याची बाब समोर आली आहे. संबंधित कामातील निष्काळजीपणामुळे संपूर्ण शहराला पाणीटंचाईच्या खाईत लोटण्यात आल्याची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. आधीच अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे हैराण झालेल्या नागरिकांना आता साठवलेले पाणी काटकसरीने वापरण्याची वेळ आली आहे.

**उसरण जवळील बिघाडामुळे शहराचा पुरवठा विस्कळीत**

### १२ कि.मी. अंतरावरुन केला जातोय पाणीपुरवठा

या घटनेमुळे नगरपालिकेच्या नियोजनशून्य व बेपर्वा कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. नियमित देखभाल, तसेच पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था का ठेवली नाही, असा सवाल नागरिकांकडून जोर धरू लागला आहे.

### उपाय न झाल्यास आंदोलनाचा इशारा

◆पाणीटंचाई तीव्र झाल्यास नागरिकांनी आंदोलन छेडण्याचा इशारा देत आहेत. प्रशासनाने दुरुस्ती करुन पाणी पुरवठा सुरळीत करण्याची मागणी होत आहे. विशेषतः गोरगरीब कुटुंबांचे मोठे हाल होत असून पाण्यासाठीची धावपळ वाढली आहे. 'अकरा दिवसांनी पाणी, त्यातही आता पूर्ण बंद... आम्ही जगायचं कसं?' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामराजे कापरे यांनी जलवाहिनीची दुरुस्ती पूर्ण होईपर्यंत पाणीपुरवठा होणार नसल्याचे स्पष्ट करत नागरिकांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे.





बारामती विधानसभा पोटनिवडणूक सांगता सभा निमित्त उपमुख्यमंत्री सुनेत्रा वाहिनी पवार व राष्ट्रवादी चे नेते पार्थदादा पवार यांची खामगावचे माजी आमदार तथा राष्ट्रवादी अजितदादा पवार पक्षाचे नेते राणा दिलीपकुमार सुनंदा यांनी सदिच्छा भेट घेतली. बारामती निवडणुकीसाठी दिलीप कुमार सुनंदा यांनी शुभेच्छा दिल्या.

# त्या ॲप विरोधात ग्रामरोजगार सहाय्यकांचे कामबंद आंदोलन

प्रतिनिधी २२ एप्रिल

**मेहकर :** मेहकर तालुक्यातील ग्रामरोजगार सहाय्यकांनी एनएमएमएस (फेस अटेन्डन्स) ॲपविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत कामबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. या संदर्भात तहसील कार्यालय, मेहकर येथे निवेदन सादर करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, केंद्र शासनाच्या आदेशानुसार एनएमएमएस ॲपद्वारे उपस्थिती नोंदविण्याची सक्ती करण्यात आली आहे. मात्र, राज्य शासनाच्या २ मे २०११ च्या निर्णयानुसार ग्रामरोजगार सहाय्यक हे पद अर्धवेळ असल्याचे स्पष्ट असून त्यांच्याकडून पूर्णवेळ कामाची अपेक्षा करणे चुकीचे असल्या असल्याचे त्यांनी म्हटले आहे.तसेच ३ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी अद्याप झाली नसल्याने सहाय्यकांमध्ये नाराजी आहे. या निर्णयांची अंमलबजावणी होईपर्यंत कोणतेही ऑनलाइन अथवा ऑफलाइन काम करणार नसल्याचा ठाम इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.दरम्यान, २४ मार्च २०२६ रोजी आयुक्त कार्यालयाकडून देण्यात आलेल्या पत्रानुसार ॲपप्रणाली लागू करण्यात आली असून, त्याच्या निषेधार्थ १ एप्रिल २०२६ पासून आंदोलन सुरू असल्याचे सांगण्यात आले.यावेळी मागण्यांकडे संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा ग्रामरोजगार सहाय्यकांनी दिला आहे.

# बालिकेचा 112 वर कॉल अन् बुलढाणा ग्रामीण पोलिसांनी थांबविला बालविवाह

प्रतिनिधी २२ एप्रिल

**बुलढाणा :** तालुक्यातील दहीद बु. येथे बालविवाह होत असल्याची माहिती एका अल्पवयीन मुलीने पोलिस हेल्प लाईन ११२ दिली. माहिती मिळताच बुलढाणा ग्रामीण पोलिसांनी ॲक्शन मोडवर येत पोलिस निरिक्षक आशिष रोही यांनी पथकासह घटनास्थळ दाखल होत बालविवाह थांबविला.

एका अल्पवयीन मुलीने पोलिस हेल्प लाईन ११२ वर कॉल करीत बुलढाणा तालुक्यातील दहीद बु. येथे २१ एप्रिल रोजी बालविवाह आयोजीत करण्यात आल्याची माहिती दिली. सदर गाव बुलढाणा ग्रामीण पोलिस स्टेशन हद्दीत येत असल्याने पोलिस निरीक्षक आशीष रोही यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलिस अधीक्षक अमोल गायकवाड, बुलढाणा उपविभागीय पोलिस अधीकारी सुधीर पाटील यांच्या



मार्गदर्शनाखाली पोहेकाँ. भारत खंडारे, पोकाँ. अनंता पाटील, चालक पोहेकाँ. लक्ष्मण सोळंकीसह घटनास्थळ दहीद बु. येथे येथे दाखल झाले. मोक्यावर ग्रामसेविका मनिषा पवार, पोलिस पाटील श्रीकृष्ण राऊत, अंगणवाडी सेविका रेखा सुरुशे, सरपंच अर्जुन दांडगे, चाईल्ड हेल्प लाईन प्रकल्प समन्वयक शेख सोहेब शेख हाफीस व चाईल्ड हेल्पर मुकेश मोरे, केस वर्कर चाईल्ड हेल्प लाईन बुलढाणा यांना पाचारण करुन बालविवाह थांबविण्यात आला. बालिकेस तिच्या आईसोबत बाल कल्याण पथकामार्फत हजर करण्यात आले. सदर बालिकेस बाल न्याय मंडळाचे आदेशान्वये बालगृहामध्ये दाखल करण्यात आले आहे. संबंधित पालक व आयोजकांना कायदेशीर समिती बुलढाणा समक्ष चौकशी व योग्य कार्यवाही करीता इशारा देण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरु आहे. बालविवाह हा कायद्याने गुन्हा आहे. बालविवाह सारख्या घटनेच्या बाबतीत नागरिकांनी कार्यतत्परता दाखवावी आणि अशा प्रकारच्या बेकायदेशीर घटनांची माहिती तत्काळ पोलिस ठाण्यास देण्याचे आवाहन बुलढाणा ग्रामीण पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक आशीष रोही यांनी केले आहे.

# आमदार डॉ. संजय कुटे यांच्या अध्यक्षतेखाली खरीप पूर्व आढावा सभा संपन्न

◆ शेतकरी बंधुनी कृषी विभागाच्या माध्यमातून ज्ञान प्राप्त करून आधुनिक शेती करावी - आ. डॉ. संजय कुटे

प्रतिनिधी २२ एप्रिल

**जलगांव जामोद :** कृषी तंत्रज्ञानाचा जागर खरीप हंगाम मोहीम २०२६ अंतर्गत योगा हॉल नगरपरिषद जळगाव जामोद येथे दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी विधानसभा मतदार संघांचे आमदार डॉ संजय कुटे यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी मंचावर तहसीलदार पवन पाटील, तहसीलदार प्रशांत पाटील, गटविकास अधिकारी पायघन आणि तांत्रिक मार्गदर्शक संजय उमाळे उपस्थित होते.

येणाऱ्या काळात अलनिनो चा प्रभाव असणार आहे याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे त्यामुळे शेतकरी बंधुनी कृषी क्षेत्रातील तज्ञ् व्यक्तीकडुन मार्गदर्शन घेऊन नियोजन करावे असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केली. आपल्या परिसरातील औषधी लागवडी कडे शेतकरी वळत आहे याचा मला आनंद आहे, शेतकरी बंधुनी याकडे वळावे आणि याबाबत असेलेल्या शासकीय योजनानांच्या लाभ ही घ्यावा असेही ते म्हणाले, येणाऱ्या काळात प्रत्येक शेतकरी बांधवांच्या बांधावर लवकरच जलसिंचन प्रकल्पतुन पाणी देण्यास मी कटीबद्ध आहे. शेतकऱ्यांमध्ये संवाद असणे गरजेचे आहे त्यातून नवीन नवीन प्रयोग होऊन शेती समृद्ध होऊ शकते तसेच आपल्या दैनंदिन गरजा पुर्ण व्हाव्यात आणि शेती सुरळीत करता यावी याकरिता जोडधंदा पण शेतकरी बांधवानी वाढवला पाहीजे असा आग्रह ही त्यांनी यावेळी शेतकरी बांधवाना केले. यावेळी संग्रामपूर आणि जळगाव जामोद तालुक्यातील प्रगतीशील शेतकरी बंधूना कृषी विभागातर्फे आ डॉ संजय कुटे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी रमेश जाधव यांनी केले. यावेळी जळगाव जामोद आणि संग्रामपूर तालुक्यातील अनेक शेतकरी बांधव, कृषीकेंद्र चालक आणि शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते.



सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# लग्नमंडपातच ‘सोने चोरी’चा बनाव; वधू पक्षाचा काढता पाय, वरपक्षाची पोलिसांत तक्रार

प्रतिनिधी २२ एप्रिल



**अकोला :** शहरातील एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बाभुळगाव परिसरात एका लग्नसमारंभात नाट्यमय घडामोड घडल्याचे समोर आले आहे. वधू पक्षाने सोने चोरी गेल्याचा बनाव करून ऐनवेळी लग्नमंडपातून काढता पाय घेतल्याची धक्कादायक घटना बुधवारी (दि. २१ एप्रिल ) उघडकीस आली. या प्रकरणी वरपक्षाने एमआयडीसी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार येथील ठाकरे परिवारातील युवतीचे अकोला येथील चौधरी परिवारातील युवकासोबत लग्न जुळले होते. दोन्ही कुटुंबांच्या संमतीने आणि पारंपरिक पद्धतीने लग्नाची सर्व तयारी पूर्ण करण्यात आली होती. बाभुळगाव परिसरातील मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात लग्नसोहळा पार पडत असताना अचानक घडलेल्या या प्रकारामुळे उपस्थितांमध्ये एकच खळबळ उडाली. वरपक्षाच्या म्हणण्यानुसार, लग्नाच्या अनुषंगाने वधूसाठी सुमारे अडीच लाख रुपयांचे सोन्याचे दागिने खरेदी करून देण्यात आले होते. तसेच लग्न समारंभासाठी सुमारे तीन लाख रुपयांचा खर्चही करण्यात आला होता. मात्र, लग्नाच्या विधीपूर्वी वधूच्या अंगावर ते दागिने दिसत नसल्याने वरपक्षाने याबाबत चौकशी केली. यावेळी वधूपक्षाने ‘सोने चोरीला गेले’ असा दावा करत गोंधळ उडवून दिला. मात्र, वरपक्षाने या दाव्यावर संशय व्यक्त करत अधिक माहिती विचारताच वधूपक्षाने अचानक मंडप सोडून निघून गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे लग्नसोहळा अक्षरशः अर्धवटच राहिला. या प्रकारामुळे वरपक्षाची आर्थिक व मानसिक फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला असून, संबंधित वधूपक्षाविरुद्ध कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. एमआयडीसी पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली असून, नेमका प्रकार काय घडला याचा तपास सुरू असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. दरम्यान, या घटनेमुळे शहरात विविध चर्चा रंगू लागल्या असून लग्नसमारंभात घडलेल्या या अनपेक्षित प्रकारामुळे नातेसंबंधातील विश्वासावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# सत्ताधारी भाजपच्या हुकूमशाहीचा शिवसेनेकडून निषेध

♦ मनमानी कारभाराविरुध्द लढा उभारु असा दिला इशारा




प्रतिनिधी २२ एप्रिल

**अकोला :** महापालिकेतील सत्ताधारी भाजपच्या हुकूमशाहीचा शिवसेना उबाठा पक्षाकडून निषेध करण्यात आला. शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक मोर्चाने महापालिकेवर आले. मालमत्ता करात समाविष्ट केलेले ६०० रुपये रद्द करा तसेच घंटागाडी शुल्क पूर्णपणे माफ करा अशी मागणी करण्यात आली. महापालिका आयुक्तांना निवेदन दिले.

महापालिकेत सत्ता पक्षाकडून जनतेवर बोजा लादला जात आहे. ही मनमानी सहन करणार नाही असा इशारा शिवसेना शहर प्रमुख राहुल कराळे यांनी दिला. यावेळी नगरसेवक विजय इंगळे, अभय खुमकर, शंकरराव लंगोटे, अनिल परचुरे, आशीष गावंडे, अश्विन कपले, राहुल वरोकार, गजानन फुंडकर यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने सामील होते. शिवसैनिकांनी जनतेला वेठीस धरू नका. नाही तर तीव्र आंदोलन करू असा इशारा दिला.


# थकित मालमत्ता करावर १००टक्के माफी, शास्ती अभय योजनेला मुदतवाढ

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अकोला :** महानगरपालिकेच्या वतीने सर्व मालमत्ता धारकांना शास्ती अभय योजनेअंतर्गत २०/०४/२०२६ पर्यंत थकबाकीवरील शास्ती (दंड) माफीची योजना राबविण्यात आली होती.

परंतु नागरिकांच्या सोयीचा विचार करून योजनेला मुदतवाढ देण्यात आलेली असून, ३०/०४/२०२६ पर्यंत १००टक्के शास्ती माफी योजना पुन्हा राबविण्यात येत आहे. ज्या मालमत्ता धारकांनी अद्याप या योजनेचा लाभ घेतलेला नाही, त्यांनी त्वरित थकबाकी एकरकमी भरून १००३ शास्ती माफी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा करण्यात येत आहे. ही योजना मर्यादित कालावधीसाठी असल्यामुळे, संबंधितांनी या अंतिम मुदतीपूर्वी या संधीचा लाभ घ्यावा.

# जन सेवार्थ जनजागृती संस्थेची अनाथ, गरजू मुलींच्या लग्नासाठी आर्थिक सहाय्य




प्रतिनिधी २२ एप्रिल

**अकोला :** अक्षय तृतियेच्या शुभ मुहूर्तावर जन सेवार्थ जनजागृती संस्थेद्वारा अनाथ व गरजू मुलींच्या लग्नासाठी आर्थिक मदत देण्याचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष पंकज देवीदास काळे व संदीप देविदास काळे यांच्या आई वडिलांचे स्मृतिपित्यर्थ प्रत्येकी रुपये २१ हजाराचा आर्थिक निधी या तीन परिवारांसाठी देण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे डॉ. वैभव टापरे, माजी नगरसेवक दिलीप भाऊ देशमुख, दखल संघटनेचे कार्यकर्ते काजल ताई राजवैद्य, महेश देशमुख व हांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच युवा कामगार संस्थेचे कार्यकर्ते यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

# भर उन्हाळ्यात सिलेंडरसाठी ग्राहक हैराण

♦ गॅस एजन्सी धारकांचा मनमानी कारभार

प्रतिनिधी २२ एप्रिल




**अकोला :** शहरात वाढत्या उन्हाच्या तडाख्यात नागरिकांना आणखी एक मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिकांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत असून, काही ठिकाणी परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की गॅस एजन्सीवर पुन्हा एकदा लांबच लांब रांगांची स्थिती निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अनेक ग्राहकांनी महिनाभरापूर्वी नंबर लावूनही सिलेंडर मिळत नसल्याची तक्रार केली आहे. त्यामुळे संतप्त नागरिकांनी एजन्सीसमोर गर्दी करत नाराजी व्यक्त केली. ‘वारंवार फेऱ्या मारूनही सिलेंडर मिळत नाही, आम्ही नेमकं करायचं काय?’ असा सवाल ग्राहकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, गॅस एजन्सी धारकाचा मनमानी कारभार सुरू असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. वेळेवर वितरण न करणे, स्पष्ट माहिती न देणे आणि फोनला प्रतिसाद न देणे, यामुळे ग्राहकांचा संताप आणखी वाढत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत स्वयंपाकासाठी गॅसची गरज अधिक असताना, अशा प्रकारच्या हलगर्जीपणामुळे सामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना रांगेत उभे राहणे अधिकच कठीण जात आहे. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन कारवाई करावी, तसेच गॅस वितरण व्यवस्था सुरळीत करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

### ग्राहक पंचायत पदाधिकाऱ्यांची चर्चा

◆गॅस ग्राहकांना सध्या जो त्रास होतो आहे तो दूर व्हावा तसेच ग्राहकांना घरपोच डिलिव्हरी द्यावी यासाठी ग्राहक पंचायतचे विदर्भ प्रांत सदस्य विजय बहाकार, जिल्हाध्यक्ष मंजित देशमुख यांनी पटेल गॅस एजन्सीचे संचालक तसेच एचपीच्या अधिका-यांशी चर्चा केली. ग्राहकांची अडचण सोडविण्याचे त्यांनी मान्य केले अशी माहिती सूत्रांनी दिली.

# कुरणखेडला प्रवासी निवारा नाही



प्रतिनिधी २२ एप्रिल

♦ प्रवासी उन्हाचे चटके सहन करीत रस्त्यावर

**अकोला :** कुरणखेडला प्रवासी निवारा नसल्याने प्रवासी भर उन्हात रस्त्यावर वाहनांची वाट पाहत बसलेले दिसतात. ४४ अंश तापमानात चटके सहन करीत बसावे लागते. ही शोकांतिका लक्षात घ्यायला कोणाला वेळ नाही हे दुर्दैव आहे.

वृद्ध, महिला, लहान मुले मुली रोडच्या बाजूला बसलेले दिसतात. अकोला परिसरात एवढे तापमान आहे. परंतु ग्रामीण भागात प्रवासी निवारा नाही. बस येईपर्यंत २-२ तास विद्यार्थ्यांना, नागरिकांना उभे रहावे लागते. याची प्रशासनाने लवकरात लवकर दखल घ्यावी अशी विनंती गावकऱ्यांनी केली आहे. सध्या उन्हाळा आणि पुढे पावसाळा आहे. उन्हाळ्यात तप्त ऊन आणि पावसाळ्यात ओलेचिंब व्हायचे अशा यातना सहन कराव्या लागत आहेत. लोकप्रतिनिधी, संबंधित अधिकारी यांनी लक्ष घालून नागरिकांना सोसाव्या लागत असलेल्या त्रासातून त्यांची सुटका करावी अशी मागणी केली जात आहे. अन्यथा आंदोलन करू असा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

# क्रीडा संकुलातील बेफिकिरीचा कळस; खेळाडू संतप्त, आंदोलनाचा इशारा!

**थंड पाण्याची सुविधा नाही, ग्रीझर बंदच**

प्रतिनिधी २२ एप्रिल




**तेल्हारा :** शहर व ग्रामीण भागातील शेकडो खेळाडू दररोज सकाळ-संध्याकाळ क्रीडा संकुलात सरावासाठी हजेरी लावतात. मात्र, येथे मूलभूत सुविधांचाही पूर्णपणे अभाव असल्याने खेळाडूंमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

उन्हाळ्याचा कडाका दिवसेंदिवस वाढत असताना, क्रीडा संकुलात थंड पिण्याच्या पाण्याची कोणतीही व्यवस्था नाही. नादुरुस्त ग्रीझरमुळे खेळाडूंना गरम पाणी पिण्याची वेळ येत असून, त्यामुळे त्यांच्या आरोग्यावरही परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून याकडे पूर्ण दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप खेळाडूंनी केला आहे.

इतकेच नव्हे, कबड्डी सरावासाठी आवश्यक असलेली मातीही उपलब्ध करून दिली जात नसल्याने खेळाडूंना अडचणींचा सामना करावा लागत आहे. योग्य सुविधा नसल्यामुळे अनेक होतकरू खेळाडूंचा सराव खंडित होत असून, त्यांच्या भवितव्याशी खेळ होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, क्रीडा संकुलातील कर्मचारी नियमितपणे हजर राहत नसल्याने परिसरात कोणीही मुक्तपणे ये-जा करत आहे. त्यामुळे सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून, कोणतीही अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. ‘खेळाडूंच्या मूलभूत गरजांकडे इतके दुर्लक्ष का?’ असा सवाल उपस्थित करत खेळाडूंनी प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला आहे. यासंदर्भात खेळाडूंनी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन देत, दोन दिवसांत सर्व समस्या सोडवाव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. आता प्रशासन जागे होणार का, की खेळाडूंना रस्त्यावर उतरावे लागणार? असा प्रश्न नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे.

# हमजा प्लॉटमध्ये जिकडेतिकडे कचरा

♦ रहिवाशांना दररोजचा त्रास, आरोग्याशी खेळ



प्रतिनिधी २२ एप्रिल

**अकोला :** वाशिम बायपासजवळील हमजा प्लॉट परिसरात कचऱ्याचे ढीग साचले आहेत. नागरिक दुर्गंधीने त्रस्त आहेत, पण महापालिका प्रशासन याकडे लक्ष द्यायला तयार नाही. निवडून दिलेले नगरसेवक फक्त मतं मागायलाच येणार का? या भागाची स्वच्छता कधी होणार? अशी विचारणा या भागातील नागरिक करीत आहेत. साचलेला कचरा ही काही विशिष्ट भागातील समस्या राहिलेली नाही तर हा विषय शहरासाठी डोकेदुखी झाला आहे. महापालिका आरोग्य विभागाने याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्याशिवाय नागरिकांना दिलासा मिळणार नाही. तसेच सध्या डासांचे प्रमाणात देखील मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कारण लोकांच्या आरोग्याचा प्रश्न आहे.

# वीजेच्या समस्ये बाबत सनातन संस्कृती महासंघाचे मुख्यमंत्र्यांना पत्र

प्रतिनिधी २२ एप्रिल

**अकोला :** येथील जुने शहर भागातील वीजेची समस्या कायमस्वरूपी दुर करणे, तसेच महावितरण कंपनी तर्फे राबविण्यात येत असलेले आपत्कालीन भारनियमन बंद करण्या बाबत सनातन संस्कृती महासंघाने राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री यांना इमेल द्वारा पत्र पाठवले आहे. त्याची प्रत व्यवस्थापकीय संचालक महावितरण तसेच अध्यक्ष महाराष्ट्र वीज नियामक आयोग यांना देखील पाठवली आहे. पत्रात म्हंटले आहे की, जुने शहरातील अगरवेस, गुलजारपुरा भागातील वीजेची समस्या जुनी असून ती आता गंभीर झाली आहे. वीज पुरवठा वारंवार खंडीत होत असल्यामुळे वीज ग्राहक त्रस्त झाले आहेत. १७ एप्रिल पासून महावितरण कंपनी तर्फे या भागात सायंकाळी एक तास आपत्कालीन भारनियमन राबविण्यात येत आहे. अकोल्याचा उन्हाळा संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे. दिवसा सोबत रात्रीचे तापमान देखील वाढले आहे. वीजेचा लपंडाव सुरू असतांना पुन्हा सायंकाळी एक तासाचे भारनियमन ग्राहकांवर लादण्यात आले आहे. आपत्कालीन भारनियमन फक्त याच भागात राबविण्यात येत आहे. पत्रात पुढे म्हंटले आहे की, वीजचोरी किंवा कुठल्याही कारणामुळे होणारी वीज गळती यावर नियंत्रण ठेवण्याची तसेच थकबाकी वसूल करण्याची जबाबदारी महावितरण कंपनीची आहे. यात कंपनी अपयशी ठरत असेल तर त्याची शिक्षा प्रामाणिक वीज ग्राहकांनी का सोसावी? असा प्रश्नही उपस्थित केला आहे. महावितरण कंपनीने भारनियमन राबविण्याच्या दृष्टीने वीजहानी आणि थकबाकी च्या आधारावर फिडर चे ग्रुप बनवले आहेत. जे चुकीचे आहेत. जास्त वीजहानी आणि थकबाकी असलेल्या फिडर वर प्राधान्याने, जास्त काळ भारनियमन राबविण्यात येते. कंपनीचे कर्मचारी आणि अधिकारी आपली जबाबदारी झटकून जास्त वीजहानी तसेच थकबाकी असलेल्या फिडर वरील ग्राहकांना वेठीस धरत आहेत. हे अन्यायकारक आहे पत्राच्या शेवटी जुन्या शहरातील या भागाची वीजेची समस्या कायमस्वरूपी दुर व्हावी या दृष्टीने, तसेच भारनियमन राबविण्यासाठी महावितरण कंपनीने वीज हानी तसेच थकबाकीच्या आधारावर जे ग्रुप बनवले आहेत ते रद्द करावेत, तसेच कुठल्याही फिडर वरील ग्राहकांवर भारनियमन राबवितांना अन्याय होणार नाही असे निर्देश महावितरण कंपनीला देण्याची व्यवस्था करावी. अशी विनंती मुख्यमंत्र्यांना सनातन संस्कृती महासंघातर्फे करण्यात आली असल्याचे प्रसिद्धी प्रमुख विजय केंदरकर यांनी कळविले आहे.

# अकोल्यात ‘राज्यस्तरीय कर्तृत्व शिखर महिला रत्न पुरस्कार 2026’ सोहळा दिमाखात साजरा

प्रतिनिधी २२ एप्रिल




**अकोला :** येथील सौ. संगीता राजू धोंडफळे यांना सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय महिला रत्न पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. युवा विचारपीठ अकोलाच्या वतीने आयोजित ‘राज्यस्तरीय कर्तृत्व शिखर महिला पुरस्कार २०२६’ सोहळ्यात विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. त्यामध्ये सौ. संगीता राजू धोंडफळे यांना सांस्कृतिक क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दल गौरविण्यात आले.

समाजातील महिलांचे स्थान अधिक बळकट करणे, संस्कृतीची जपणूक करणे तसेच बदलत्या युगात नवीन सांस्कृतिक मूल्यांची जडणघडण घडवून आणण्याच्या त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला. हा भव्य सोहळा अकोला येथील प्रमिलाताई ओक हॉलमध्ये झाला. यावेळी महापौर शारदा खेडकर, मॅडम, अपर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, आरटीओ त्रिवेणी घोलप यांची प्रमुख उपस्थिती होती. हा पुरस्कार मिळाल्याने सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत महिलांना राज्यस्तरावर प्रोत्साहन मिळत असून, युवा विचारपीठ, अकोला यांनी केलेल्या या उपक्रमाबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत. पुढील वाटचालीतही अशाच उत्साहाने आणि जिद्दीने कार्य करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK